सोलापूर
Solapur Tarun Bharat
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर शनिवार, दि. ०६ सप्टेंबर २०२५ वर्ष - तिसरे अंक १५५ पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



## संक्षिप्त वृत्त...

### सेलू नगर परिषद निवडणुक प्रभाग निहाय अचुक मतदार यादी तयार करण्याची निवडणुक आयोगाकडे मागणी

**सेलू,/प्रतिनिधी:** महाराष्ट्र राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहे. या मध्ये सेलू नगर परिषदची हि निवडणूक होणार आहे. या पार्श्वभूमीवर सेलू नगरपरिषद निवडणुक करीता प्रभाग निहाय अचुक, दोष रहित मतदार यादी तयार करण्याची मागणी एका निवेदनाद्वारे येथील सामाजिक कार्यकर्ते शेख महेमुद अमिनोद्दीन यांनी ईमेल व जिल्हाधिकारी परभणी मार्फत निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग यांचेकडे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, प्रभाग निहाय मतदार यादी तयार करत असतांना प्रभागांची व्याप्ती व सिमेनूसारच त्या त्या प्रभागांची मतदार यादी अचुक व दोष रहित तयार करणे आवश्यक आहे.

या पुर्वि तयार करण्यात आलेल्या मतदार यादीत प्रभागाबाहेरील मतदारांची नावे समाविष्ट करण्याचे प्रकार घडलेले आहेत. सदोष मतदार यादी तयार केल्यास त्यावर आक्षेप व वेळप्रसंगी न्यायालयात आव्हान देण्यात येतात. परीणामी निवडणुकीवर विपरीत परिणाम होतो. न्यायालयात आव्हान देण्यात आल्यास निवडणूक लांबणीवर पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या करीता स्थानिक प्रशासन, अधिकारी व कर्मचारी यांनी प्रभाग निहाय मतदारांच्या घरो घरी भेट देऊन, मतदारांची प्रत्यक्ष पडताळणी करुन व्यवस्थित मतदार यादी तयार करावी.

सदोष मतदार यादी तयार केली, प्रभागाबाहेरील मतदारांची नावे यादीत समाविष्ट केली, दुबार नावे समाविष्ट केली तर संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना दोषी धरण्यात यावे अशी मागणी शेख महेमुद अमिनोद्दीन यांनी आयुक्त महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग यांच्याकडे केली आहे. निवेदनाच्या प्रति जिल्हाधिकारी परभणी, उपविभागीय अधिकारी सेलू, तहसिलदार सेलू , मुख्याधिकारी तथा प्रशासक नगरपरिषद सेलू यांना देण्यात आल्या आहेत.

### प्रसुती झालेल्या बेपत्ता महिलेचा शोध माहिती देण्याचे नागरिकांना आवाहन

#### नवजात बाळाची प्रकृती नाजूक

**परभणी,/प्रतिनिधी:** मानवत ते सेलू रेल्वे प्रवासादरम्यान १३



ऑगस्ट २०२५ रोजी अर्चना गणपत निकम (रा. आंबेडकर नगर, नांदेड (रुग्णालयाच्या रेकॉर्डनुसार)) या महिलेची प्रसूती झाली. सेलू येथील प्राथमिक उपचार केंद्रात प्राथमिक उपचारानंतर तिला व बाळाला परभणी जिल्हा स्त्री रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचार सुरू असतानाच सदर महिला कोणालाही न सांगता रुग्णालयातून निघून गेली. बेपत्ता महिला किंवा तिच्या नातेवाईकांबाबत कुणाला काही माहिती असल्यास जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, परभणी, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, चाइल्ड हेल्पलाइन : १०९८, कोतवाली पोलीस स्टेशन, परभणी, स्त्री रुग्णालय, परभणी, बालकल्याण समिती, परभणी, येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी मोनिका रंधवे यांनी केले आहे.

दरम्यान, नवजात बाळाची प्रकृती नाजूक असून त्याची काळजी स्त्री रुग्णालयातील नवजात शिशु दक्षता विभाग तसेच आशा शिशु गृह, परभणी येथील कर्मचारी घेत आहेत. या प्रकरणाची नोंद कोतवाली पोलीस स्टेशन, परभणी येथे करण्यात आली असून महिलेचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

### महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या कोअर बँकींग प्रणालीचे १३ ते १६ सप्टेंबर कालावधीत एकत्रीकरण होणार

**परभणी,/प्रतिनिधी:** अर्थमंत्रालय तथा वित्तीय सेवा विभाग, भारत सरकार यांच्या मार्फत दि. ०७ एप्रिल २०२५ रोजी प्रसिद्ध झालेल्या राजपत्रानूसार, तत्कालीन महाराष्ट्र ग्रामीण बँक आणि विदर्भ कोकण ग्रामीण बँक या बँकांचे एकत्रीकरण होऊन दि. १ मे २०२५ पासून संपूर्ण महाराष्ट्र राज्यासाठी नवीन महाराष्ट्र ग्रामीण बँक अस्तित्वात आली आहे. पूर्वी प्रमाणेच महाराष्ट्र ग्रामीण बँक हि संपूर्ण शासकीय मालकीची बँक असून या बँकेचे भागभांडवल हे भारतसरकार, महाराष्ट्र राज्य सरकार व बँक ऑफ महाराष्ट्र यांचे आहे

या एकत्रीकरणाच्या अनुषंगाने, विदर्भ कोकण ग्रामीण बँकेच्या संगणकीय प्रणालीचे म्हणजेच कोअर बँकिंग सेवा प्रणालीचे महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या कोअर बँकिंग सेवा प्रणाली सोबतची एकत्रीकरण प्रक्रिया दि. १३ ते १६ सप्टेंबर, २०२५ पर्यंत नियोजित करण्यात आलेली आहे. या एकत्रीकरण प्रक्रियेच्या कालावधीत सर्व डिजिटल व इतर बँकिंग सेवा जसे की एटीएम, मोबाईल बँकिंग, इंटरनेट बँकिंग, युपीआय, आरटीजीएस, एनईएफटी, आयएमपीएस, डीबीटी, व्हीकेवायसी, आधार आधारित पेमेंट प्रणाली, धनादेश वटविणे, स्थायी सूचनांसह नियत आदेश या सर्व सेवा कालावधीत तात्पुरत्या विलंबित किंवा खंडित होऊ शकतात. ही एकत्रीकरण प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर या सर्व सेवा पुन्हा पुर्ववत सुरू होतील.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# वाल्मिकी अर्बन बँकेला मिळाला 'सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार'

## मुख्य कार्यकारी अधिकारी बि.यु.बिडवे यांची माहीती

**मोहन धारासूरकर**

**पाथरी /प्रतिनिधी-** महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स फेडरेशनच्या वतीने दरवर्षी सहकारी नागरी बँकांच्या गुणवत्तापूर्ण कार्याचा गौरव करण्यासाठी 'सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार' प्रदान करण्यात येतो.या अनुषंगाने सहकार क्षेत्रातील प्रामाणिक व नाविन्यपूर्ण कार्याची दखल घेऊन पाथरी येथील वाल्मिकी अर्बन बँकेला 'सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार मिळाला आहे. याबाबतचे महाराष्ट्र फेडरेशन चे अध्यक्ष अजय ब्रम्हेचा यांचे पत्र ४ सप्टेंबर रोजी मिळाले आहे अशी माहीती वाल्मिकी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बि.यु.बिडवे यांनी दिली आहे.

पाथरी येथील वाल्मिकी अर्बन को-ऑप. बँकेचे कुशल चेअरमन अनिलराव नखाते, संचालक मंडळ,सर्व कर्मचारी यांची यशस्वी कामगिरी, पारदर्शक कार्यपद्धती, ग्राहकाभिमुख धोरणे आणि सहकारभावना १०० कोटीपर्यंत च्या ठेवी याची महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स फेडरेशनने दखल घेत सन २०२४-२५ या वर्षासाठी युनिट बँका व १०० कोटीपर्यंत ठेवी असलेल्या बँका या गटातून



वाल्मिकी अर्बन को-ऑप. बँक लि., पाथरी या बँकेस 'द्वितीय क्रमांकाचा सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार' जाहीर झाला आहे.या पुरस्काराचे वितरण समारंभ १३ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी २.३० वाजता नाशिक येथील 'श्री स्वामीनारायण कन्व्हेन्शन सेंटर, न्यू आडगाव नाका, मुंबई-आग्रा रोड, पंचवटी' येथे होणार असून यासाठी वाल्मिकी अर्बन बँकेचे चेअरमन व मान्यवर मंडळाने उपस्थित राहून सन्मान स्वीकारावा अशी विनंती या पत्रात केली आहे.फेडरेशनच्या परिवारातर्फे वाल्मिकी अर्बन को-ऑप. बँक प्रशासनाचे अभिनंदन केले आहे.

वाल्मिकी बँक स्थापनेपासून रिझर्व्ह बँकेच्या निर्देशाचे पालन करीत संगणकीकृत व्यवहार, मोबाईल बँकिंग, एटीएम सुविधा,व्यवहारातील पारदर्शकता,समांतर ठेवी व कर्जवाटप अशा पध्दतीने सुयोग्य नियोजन करीत बँकेने प्रगतीचा आलेख चढता ठेवला,यापूर्वी बँकेला अनेक पुरस्काराने सन्मानित केले आहे. आता महाराष्ट्र फेडरेशनचा सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार सन्मान हा बँक लौकीकात भर टाकणारा आहे. चालू वर्षी बँकेच्या ठेवी १०० कोटी च्या वर झालेल्या असुन बँकेचा टायर दोन मध्ये समावेश झालेला आहे. यापुढे बँक आणखीन सर्वोत्तम पुरस्कारासाठी पात्र ठरेल असा विश्वास बँक प्रशासनाकडून व्यक्त केला आहे.

### हे सर्व टिम वर्क चे यश : नखाते


**बैठकीच्या माध्यमातून संचालक मंडळाचा वेळोवेळी सुसंवाद ,तत्परसेवेसाठी बँक व्यवस्थापन,कर्मचारी आणि वसुली अधिकारी, सभासद, ग्राहक तसेच हितचिंतक या सर्वांच्या समन्वयाने बँकेला सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार मिळाला आहे.हा पुरस्कार बँकेला नवे चैतन्य व उर्जा प्रदान करणारा आहे. हे यश सर्व टिम च्या परिश्रमाचे आहे.**
**अनिलराव नखाते चेअरमन, वाल्मिकी अर्बन बँक पाथरी**



### पालम येथे पांडुरंग रूद्रवार यांचा सेवापूर्ती सोहळा सपंन्न

**पालम,/प्रतिनिधी-** येथे श्री.पांडुरंग सुधाकरराव रुद्रवार (उच्चश्रेणी मुख्याध्यापक प्रा.शा.सातेगाव तसेच केंद्रप्रमुख कें.प्रा.शा. पेठशिवणी) यांचा सेवापुर्ती सोहळा पार पडला या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष गणेशराव रोकडे दादा (मा.कृषी सभापती परभणी तसेच संचालक जि.म.सह.बँक परभणी) व प्रमुख पाहुणे वसंतकाका सिरस्कर (मा.न.अध्यक्ष न.पं. पालम) जिय्याखान पठाण (नागराध्यक्ष न पं.पालम) पोलास साहेब (शिक्षणाधिकारी परभणी प्रा) रामरावजी लोहट (सं.अ मा. रा.शि.स.परभणी) हे होते. दादांनी पुष्पहार घालून रुद्रवार सरांना सेवापुर्तीच्या शुभेच्छा दिल्या.यावेळी भास्करराव सिरस्कर (उपनगराध्यक्ष पालम) रामरावजी रोकडे (सेवानिवृत्त कें. मुख्याध्यापक) श्री.लक्ष्मणराव रोकडे अंकल (भाजपा प्र.कार्य.सदस्य तसेच नरसेवक पालम) विजय घोरपडे,शेफ चाऊस, कैलाश रूद्रवार,ईमदाद खा पठाण,जालिदर हात्तीअंबिरे, बालाजी आन्ना बरडे, रूपेश शिनगारे, गजानन गडम आदि सह प्रमुख मान्यवर मंडळी या सेवापुर्ती कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

### भारतीय आयुर्विमा महामंडळ अडचणीच्या वेळी अत्यंत कमी वेळात आर्थिक मदत विमा धारकांना पुरवते: देशपांडे



**सेलू,/प्रतिनिधी -** भारतीय आयुर्विमा महामंडळ सर्व विमा धारकांना आर्थिक आवश्यकता पूर्ण करते, अडचणीच्या वेळी अत्यंत कमी वेळात आर्थिक मदत पुरवते, सर्वात सुरक्षित गुंतवणुक भारतीय आयुर्विमा महामंडळ मध्य आहे,कारण आपल्या मागे सुध्दा पैसेआपल्या कुटुंबाला मिळण्याची खात्री फक्त आयुर्विमा महामंडळ देते त्यांचे विमा प्रतिनिधी सर्वात जास्त सुजनशील, संवेदनशील आणि सहकार्यशील असतात असे विचार किरण देशपांडे यांनी व्यक्त केले.
सेलू येथील भारतीय आयुर्विमा महामंडळाच्या ६९ व्या वर्धापन दिनानिमित्त सेलू शाखेच्या वतीने ०१ते ०४ सप्टेंबर या कालावधी मध्ये विमा सप्ताह साजरा करण्यात आला विमा सप्ताहाच्या निमित्ताने सेलू भारतीय आयुर्विमा महामंडळ शाखेच्या वतीने,विकास अधिकारी,विमा प्रतिनिधी व सी एल आय ए विमा प्रतिनिधींचा शाल व पुष्पगुच्छ देऊन प्रमुख पाहुणे व प्रमुख अतिथी यांचे हस्ते सत्कार करण्यातआले या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संतोष कोडगिरकर(शाखा प्रबंधक) किरण देशपांडे प्रमुख पाहुणे(उपमुख्याध्यापक नुतन विधालय)डी के माघाडे प्रमुख अतिथि(शिक्षक शाळा केमापुर)म्हणून उपस्थित होते,नागेश पुराणिक, प्रभाकर भांडवले,योगेश जयभाये,सुभाष राठोड,शमशोदिन शेख,उपेंद्र बेल्लुरकर,भास्कर हिप्परगे,किरण गुंडेकर,प्रदीप कानकाटे,शिवशांत काळे,शिवाजी अघाव,समीर थोरात,जाकेर शेख, रामा धोतरे,कृष्णा बोराडे,मन्मथ देवडे,अमर पाटील,नामदेव मुंढे,राजकुमार नाईकवाडे,शंकर जिवने,संपत कपाळे,साहेबराव राठोड,संदीप जाधव,डॉ अनिल शेळके,प्रकाश रोडगे,कृष्णा गोंगे,व्ही डी शिंदे,सुरेंद्र सराफ,संजय निर्वळ,सुजय काला,संजय मनियार,पांडुरंग चिंचाने,संतोष हरनावळ,बळीराम पाते,एकनाथ हिंगे,अमिर शेख,बबन झोल आदि उपस्थित होते.

### फळा येथे एक गाव एक गणपतीची आरती गणेशराव रोकडे यांच्या हस्ते सपंन्न

**शांतीलाल शर्मा**

**पालम,/प्रतिनिधी-** पालम तालुक्यातील श्री क्षेत्र फळा येथे एक गाव एक गणपतीची स्थापना करण्यात आली आसुन या गणपतीची आरती गणेशराव रोकडे दादा (मा.कृषी सभापती परभणी तसेच संचालक जि.म.सह.बँक परभणी) यांच्या हस्ते करण्यात आली.

यावेळी डॉ. रामराव उंदरे (सभापती),पौळ सर (मु. अ. माखणी) तुकाराम महाराज पौळ मा सरपंच, व्यंकटराव पौळ, मा. उपसरपंच अंगद पौळ सरपंच गणेश रानडे, विठ्ठल महाराज पुरी, मनोहर पौळ, निवृत्ती पौळ, माधव पौळ,संभाजी पौळ, भागवत महाराज पौळ, सतीश पौळ अध्यक्ष अक्षय ढवळे, किशन पौळ, सुग्रीव पौळ गोविंद पौळ, खंडू रानडे, आकाश रानडे,कैलास रानडे हे होते तसेच श्री क्षेत्र फळा येथील मराठा आरक्षणाच्या आंदोलनात विजयी झालेल्या बांधवाचा फळा येथे गणेशराव रोकडे (दादा) यांच्या हस्ते मराठा बांधवाचा सत्कार करण्यात आला.



### डॉ.राधा तांबे यांना आदर्श योग प्रशिक्षक पुरस्कार

**सोनपेठ,/प्रतिनिधी-** श्रीमती डॉ. राधा सचिन तांबे गेल्या सहा



वर्षांपासून योग क्षेत्रात कार्यरत असून त्यांनी समाजासाठी अमूल्य योगदान दिले आहे. त्यांनी योग शिबिरांचे आयोजन करून अनेक महिला तसेच वृद्धांना आजारमुक्त, निरोगी व आनंदी जीवन जगण्याची प्रेरणा दिली आहे. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने 'आदर्श योग प्रशिक्षक पुरस्कार' प्रदान करण्यात आला आहे
तांबे यांनी आंतरराष्ट्रीय योग स्पर्धांमध्ये नेपाळ, थायलंड आणि व्हिएतनाम येथे सुवर्णपदके मिळवून देशाचा आणि राज्याचा मान उंचावला आहे.एम ए योगशास्त्र पदव्युत्तर शिक्षण घेऊन त्या बीड येथे योगा सेंटर चालवतात. सध्या त्या चराठा प्राथमिक आरोग्य केंद्रात योग प्रशिक्षण देत आहेत. योग शिबिरांच्या माध्यमातून त्या रुग्णांना आरोग्यदायी जीवन जगण्यास मदत करत आहे.

## सेलूतील श्रीराम प्रतिष्ठानात शिक्षक दिनानिमित्त आर्दश शिक्षक पुरस्कार व निबंध स्पर्धा संपन्न

**शिवाजी आकात**

**सेलू,/प्रतिनिधी:** दि. ५ सप्टेंबर २०२५: श्रीराम प्रतिष्ठान संचलित एल. के. आर. रोडगे प्रिन्स इंग्लिश स्कूल, सेलू येथे डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने परभणी जिल्ह्यातील शिक्षकांसाठी आदर्श शिक्षक पुरस्कार आणि जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेचा भव्य सोहळा दुपारी १:३० वाजता शाळेच्या सभागृहात आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाने शिक्षकांचे योगदान आणि शिक्षण क्षेत्रातील नाविन्यपूर्णदृष्टिकोनालासन्मानित करण्याचा उद्देश साध्य केला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्रीराम प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय रोडगे यांनी भूषवले. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून सचिव सौ. सविता रोडगे, प्रमुख पाहुणे माजी मुख्याध्यापक, गुगली धामणगाव आणि २००९ च्या राज्य शासन आदर्श पुरस्कार विजेते श्री. रोहिदास वायाळ, मुख्याध्यापक, पी. एम. श्री जिल्हा परिषद शाळा, डासाळा श्री. मधुकर रामभाऊ काष्टे, श्री. अमोल निकम, श्री. विकास




मुपडे, प्रशासकीय अधिकारी प्रा. महादेव साबळे यांच्यासह श्रीराम प्रतिष्ठान संचलित सर्व घटक संस्थांचे मुख्याध्यापक मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. रत्नपारखी यांनी केले, तर संदीप आकात, डिगांबर टाके आणि सौ. कल्पना भाबट यांनी सूत्रसंचालन करत कार्यक्रमाला रंगत आणली.

आदर्श शिक्षक पुरस्कार: या सोहळ्यात परभणी जिल्ह्यातील शिक्षकांचा त्यांच्या उल्लेखनीय योगदानासाठी सन्मान करण्यात आला. पुरस्कार विजेते खालीलप्रमाणे: आदर्श शिक्षक पुरस्कार: श्री. मधुकर रामभाऊ काष्टे, केंद्रीय प्राथमिक शाळा, डासाळा उपक्रमशील शिक्षक पुरस्कार: श्री. अमोल सोपानराव निकम, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, दिग्रस खुर्द नाविन्यपूर्ण शिक्षक पुरस्कार: श्री. मल्लिकार्जुन नागप्पा देवरे, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, लिंबा, ता. पाथरी जिल्हास्तरीय निबंध स्पर्धा: 'शिक्षणामध्ये अभिप्रेत असलेले आवश्यक बदल' या विषयावर आयोजित जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेचा निकालही यावेळी जाहीर करण्यात आला. विजेते खालीलप्रमाणे: प्रथम: श्री. विकास सुरेशराव मुपडे, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वाकी द्वितीय: शुभम नारायण झोल, प्रिन्स इंग्लिश स्कूल, सेलू तृतीय: रेश्मा अशोक चौगुले, प्रिन्स इंग्लिश स्कूल, सेलू या सोहळ्यात श्रीराम प्रतिष्ठान संचलित सर्व घटक संस्थांतील शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये एल. के. आर. रोडगे प्रिन्स इंग्लिश स्कूल, सेलू, प्रॉस्परस पब्लिक स्कूल, सेलू, उत्कर्ष विद्यालय, सेलू, ज्ञानतीर्थ विद्यालय, सेलू, क्युरियस किड्स, जिज्ञासा बालविहार, फिन किड्स, आदित्य फार्मसी कॉलेज, सेलू, अपूर्वा पॉलिटेक्निक, सेलू, आदित्य ज्युनियर कॉलेज, वालूर, आणि डॉ. राम रोडगे अध्यापक महाविद्यालय, सेलू येथील शिक्षकांचा समावेश होता. या शिक्षकांना स्मृतिचिन्ह, पुष्पगुच्छ आणि शाल देऊन गौरवण्यात आले. डॉ. संजय रोडगे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले, ''डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान आपणा सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. शिक्षक हा समाजाचा कणा आहे आणि त्यांच्या कार्याचा सन्मान करणे हा आपला कर्तव्य आहे. श्रीराम प्रतिष्ठान नेहमीच शिक्षकांचा सन्मान आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास यासाठी कटिबद्ध आहे. श्री. रोहिदास वायाळ यांनी शिक्षकांच्या भूमिकेवर प्रकाश टाकताना सांगितले, ''शिक्षक केवळ ज्ञान देत नाहीत, तर विद्यार्थ्यांचे भविष्य घडवतात. या पुरस्कारांमुळे शिक्षकांचा उत्साह आणि प्रेरणा वाढेल.'' श्री. मधुकर काष्टे यांनी शिक्षणातील नाविन्य आणि समर्पण यावर भर दिला.

हा सोहळा शिक्षकांचा सन्मान आणि शिक्षण क्षेत्रातील नाविन्यपूर्ण दृष्टिकोनाला प्रोत्साहन देणारा ठरला. दुपारी १:३० वाजता शाळेच्या सभागृहात आयोजित या कार्यक्रमाला पालक, विद्यार्थी आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संदीप आकात, डिगांबर टाके आणि सौ. कल्पना भाबट यांनी सूत्रसंचालन करत कार्यक्रमाला रंगत आणली. श्रीराम प्रतिष्ठानने शिक्षक दिनाच्या या सोहळ्याद्वारे शिक्षण क्षेत्रातील उत्कृष्टतेची परंपरा कायम ठेवली आहे.

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर शनिवार, दि. ०६ सप्टेंबर २०२५ वर्ष - तिसरे अंक १५५ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## ‘आविष्करण आंध्र’ अंतर्गत रचला गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड

पुणे : आंध्र प्रदेश इनोव्हेशन सोसायटीने स्टार्टअप्स आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यात एक ऐतिहासिक कामगिरी केली आहे. संस्थेने २४ तासांत उद्योजकता/स्टार्टअप/व्यवसाय कार्यक्रमासाठी ऑनलाइन साइन अप करणाऱ्या सर्वाधिक लोकांचा गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड प्रस्थापित केला आहे. १९ ऑगस्ट रोजी दुपारी १२:३० ते २० ऑगस्ट रोजी दुपारी १२:३० दरम्यान १,६३,२५४ नोंदणींसह हा विक्रम रचला गेला.

## अनोख्या निर्मितीपासून ते शंभर वर्षे जुन्या प्राचीन उत्कृष्ट कलाकृती सादर

छत्रपती संभाजीनगर : हस्तकला आणि सामाजिक उद्योजकतेचे जागतिक प्रतीक असलेले जयपूर रग्ज ३ सप्टेंबरपासून सर्जनशीलता, संस्कृती आणि प्रभावाचा भव्य उत्सव, रग उत्सव घेऊन येत आहे. या वर्षीची आवृत्ती इतर कोणत्याही आवृत्तीपेक्षा वेगळी आहे, ज्यामध्ये १४,००० हून अधिक हस्तनिर्मित रग्जांचा आश्चर्यकारक संग्रह प्रदर्शित केला आहे जो आजच्या डिझाइनसह भारताच्या विणकाम परंपरेच्या आत्म्याला सुंदरपणे मिसळतो. महोत्सवाचे आकर्षण म्हणजे पुरस्कार विजेत्या मंचहा संग्रहातील जवळजवळ २०० अद्वितीय गालिचे, जे ग्रामीण कारागिरांच्या कल्पनेतून थेट विणलेले आहेत.

## ‘आविष्करण आंध्र’ अंतर्गत २४ तासांत १,६३,२५४ नोंदणीं

नाशिक : ‘आविष्करण आंध्र’ मोहिमेअंतर्गत हा पराक्रम साध्य करण्यात आला, ज्याचा उद्देश विद्यार्थी, गृहिणी, नवोन्मेषक आणि तरुणांना नाविन्यपूर्ण आणि उद्योजकीय विचारसरणी स्वीकारण्यास प्रेरित करणे आहे. या कार्यक्रमाचे उद्दिष्ट तळागाळात स्टार्टअप संस्कृतीला प्रोत्साहन देणे आणि रोजगार निर्मिती आणि आर्थिक विकासाला चालना देणे आहे. आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू आणि आंध्र प्रदेश इनोव्हेशन सोसायटीचे सीईओ सूर्या तेजा यांना गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड प्रमाणपत्र गिनीजचे अधिकृत निर्णायक ऋषी नाथ आणि रणनीतिकार निश्चल बारोट यांनी एका औपचारिक समारंभात प्रदान केले.

## ‘फ्लाईट’ची नवीन ब्रँड अम्बेसेडर सान्या मल्होत्रा

नाशिक : रिलॅक्सो फुटवेअर्स लिमिटेडचा एक ब्रँड असलेल्या ’फ्लाईट’ ने प्रसिद्ध बॉलिवूड अभिनेत्री सान्या मल्होत्राला त्यांचा नवीन ब्रँड म्बेसेडर म्हणून घोषित केले आहे. फ्लाईट हा भारतातील एक आघाडीचा कौटुंबिक फॅशन फुटवेअर ब्रँड आहे. या घोषणेसोबतच, फ्लाईटने येणाऱ्या सण आणि लग्नसराईसाठी खास डिझाइन केलेली नवीन श्रेणी बाजारात आणली आहे. यामुळे ग्राहकांना प्रत्येक प्रसंगासाठी स्टाईलिश पर्याय उपलब्ध होतील.

# मुंबईसह राज्यात पावसाचा जोर वाढणार



### गणेश विसर्जन मिरवणुकांवर पावसाचे सावट

मुंबई: गेल्या काही दिवसांपासून उसंत घेतलेल्या पावसाने आता पुन्हा एकदा जोर पकडला आहे. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, शुक्रवारपासून मुंबईसह संपूर्ण राज्यात मुसळधार पाऊस होणार आहे, ज्यामुळे शनिवारी होणाऱ्या गणेश विसर्जन मिरवणुकांवर पावसाचे सावट निर्माण झाले आहे.

हवामान विभागानुसार, शुक्रवारी सायंकाळपासून ते शनिवार सायंकाळपर्यंत मुंबईत जोरदार पाऊस कोसळणार आहे. त्यानंतर रविवारी पावसाचा जोर कमी होईल. कोकण आणि घाटमाथ्यावरील भागात पुढील दोन दिवस पावसाचा जोर अधिक असण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे राज्यात हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस सुरू होता, मात्र आता हा पट्टा पश्चिमेकडे सरकत असल्यामुळे मुंबई, ठाणे आणि उपनगरांमध्ये जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. विशेषतः कोकण आणि घाटमाथ्यावर पुढील दोन दिवस पावसाचा जोर अधिक राहणार आहे.

### ऑरेंज आणि यलो अलर्ट जारी

हवामान विभागाने ठाणे, पालघर, नंदुरबार, नाशिक आणि पुणे घाट परिसरासाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे, तर मुंबई, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, धुळे, जळगाव, सातारा आणि कोल्हापूरसाठी यलो अलर्ट देण्यात आला आहे. यामुळे या भागातील नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मराठवाड्यात विजांच्या कडकडाटासह पाऊस अपेक्षित आहे, तर विदर्भात केवळ हलक्या सरींचा अंदाज आहे.

धरणे भरली, नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा

राज्यातील चांगल्या पावसामुळे अनेक धरणे भरून वाहत आहेत. नाशिक जिल्ह्यातील गिरणा धरण पूर्ण क्षमतेने भरल्याने पाणीपुरवठा आणि सिंचनाचा प्रश्न सुटला आहे, मात्र धरणाचे दरवाजे उघडण्यात आल्यामुळे नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. हवामान विभागानुसार, सप्टेंबर महिन्यात देशात सरासरीपेक्षा जास्त पाऊस अपेक्षित आहे, ज्यामुळे महाराष्ट्रातही पावसाचे प्रमाण वाढेल.

# निवडणूक आयोगाची ४४ राजकीय पक्षांना कारणे दाखवा नोटीस




मुंबई : भारत निवडणूक आयोगाने (केंद्रीय निवडणूक आयोग) ४४ राजकीय पक्षांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. या पक्षांची महाराष्ट्रातील नोंदणी रद्द होण्याची शक्यता आहे.

निवडणूक आयोगाने ज्या ४४ पक्षांना नोटीस बजावली आहे त्यांनी २०१९ पासून आतापर्यंत लोकसभा, विधानसभा आणि इतर पोटनिवडणुकीत एकही उमेदवार उभा केलेला नाही. या पक्षांमध्ये आम जनता पार्टीसह, अखंड भारतीय आवाज, अखिल भारतीय जनहित पार्टी यांसारख्या पक्षांचा समावेश आहे.

राज्यातील ४४ अप्रमाणित राजकीय पक्षांनी २०१९ पासून आतापर्यंत लोकसभा, विधानसभा आणि इतर पोटनिवडणुकीत एकही उमेदवार उभा केलेला नाही. निवडणुकाच लढवलेल्या नाहीत. यामुळे या पक्षांची नोंदणी रद्द का करू नये, असा प्रश्न निवडणूक आयोगाने उपस्थित केला आहे. कारवाई करण्याआधी बाजू मांडण्याची संधी म्हणून निवडणूक आयोगाने ४४ अप्रमाणित राजकीय पक्षांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

लवकरच महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. या निवडणुकांच्याआधीच निवडणूक आयोगाने ४४ अप्रमाणित राजकीय पक्षांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. या पक्षांची महाराष्ट्रातील नोंदणी रद्द झाली तर त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढवता येणार नाही.

कारणे दाखवा नोटीस बजावलेल्या पक्षांना त्यांची बाजू मांडण्यासाठी मर्यादीत कालावाधी उपलब्ध आहे. नोटीसला पक्षांनी दिलेले उत्तर समाधानकारक आहे की नाही, याचा निर्णय घेण्याचे सर्वाधिकार निवडणूक आयोगाकडे आहेत. निवडणूक आयोगाचे समाधान झाले नाही तर संबंधित राजकीय पक्षांची नोंदणी रद्द होण्याची शक्यता आहे.

नोटीस बजावलेल्या पक्षांना त्यांची बाजू १० आणि ११ सप्टेंबर २०२५ रोजी मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांच्यासमोर मांडण्याची संधी आहे. नोटीस बजावलेल्या पक्षांमध्ये आम जनता पार्टीसोबतच अखंड भारतीय आवाज, अखिल भारतीय जनहित पार्टी, अखिल भारतीय लोकाधिकार पार्टी, ऑल इंडिया क्रांतीकारी काँग्रेस, बहुजन रिपब्लिकन एकता मंच, भारत जनसंग्राम पार्टी, भारत उदय मिशन, भारतीय परिवर्तन काँग्रेस, भारतीय जनहित काँग्रेस पार्टी असे एकूण ४४ अप्रमाणित राजकीय पक्ष आहेत.

# वेताळवाडी किल्ल्यावर हुल्लडबाजी, हुल्लडबाजी केल्याने तोफ अंगावर

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.५ सप्टेंबर



सोयगाव जवळील वेताळवाडी किल्ल्यावर असलेल्या पंचधातू च्या तोफे जवळ गुरुवारी चार वाजेच्या सुमारास एका अज्ञात टोळक्याने हुल्लडबाजी केल्या मुळे तोफ अंगावर कोसळून एक जण गंभीर झाला असून या हुल्लडबाजी मध्ये तोफेचे नुकसान झाले आहे.याप्रकरणी सोयगाव पोलीस ठाण्यात शुक्रवारी अज्ञात टोळक्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.या घटनेतील गंभीर जखमी छत्रपती संभाजीनगर येथे उपचार घेत असल्याची माहिती हाती आली आहे.

सोयगाव शहराजवळील वेताळवाडी किल्ल्यावर आलेल्या पर्यटकांनी तोफे जवळ हुल्लडबाजी करत असताना तोफ खाली कोसळली दरम्यान यात एकाचा पाय तोफे खाली दबून गंभीर जखमी झाला आहे.या अज्ञात टोळक्याने हुल्लडबाजी मध्ये पुरातन असलेल्या पंचधातूच्या तोफेचे नुकसान केले आहे.तोफ खाली कोसळून तोफेचे नुकसान झाले आहे.याप्रकरणी पुरातत्व विभागाने शुक्रवारी सोयगाव पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी वरून शुक्रवारी सकाळी दहा वाजता पोलीस उपनिरीक्षक गजानन आरेकर यांच्यासह गजानन दांडगे,अजय कोळी,संजय सिंगल आदींच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी करून पंचनामा केला आहे.याप्रकरणी अज्ञात टोळक्याविरुद्ध सोयगाव पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल,उपनिरीक्षक गजानन आरेकर,गजानन दांडगे,अजय कोळी,संजय सिंगल आदी करत आहे.

# राज्यात अतिवृष्टीमुळे १४.४४ लाख हेक्टर शेतीचे नुकसान; २९ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळणार



मुंबई: महाराष्ट्रात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यातील तब्बल २९ जिल्ह्यांतील १९१ तालुक्यांमध्ये १४ लाख ४४ हजार ७४९ हेक्टर क्षेत्र (३६, ११, ८७२.५ एकर) शेती पिकांचे नुकसान झाले आहे. त्यापैकी १० हजार हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्र बाधित असलेले १२ जिल्हे आहेत. १५ ते २० ऑगस्टदरम्यान झालेल्या जोरदार पावसामुळे हे नुकसान झाले आहे.

या नुकसानीमध्ये सोयाबीन, मका, कापूस, उडीद, तूर आणि मूग यांसारख्या प्रमुख खरीप पिकांना सर्वाधिक फटका बसला आहे. याशिवाय, भाजीपाला, फळे, बाजरी, ऊस, कांदा, ज्वारी आणि हळद पिकांनाही मोठा फटका बसला आहे. सर्वाधिक बाधित झालेल्या जिल्ह्यांमध्ये नांदेड, वाशीम, यवतमाळ, धाराशिव आणि बुलढाणा यांचा समावेश आहे. एकट्या नांदेड जिल्ह्यात ६.२० लाख हेक्टरहून अधिक क्षेत्राचे नुकसान झाले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या सुचनेनुसार बाधित भागातील सुरु केलेले पंचनाम्याचे काम अंतिम टप्यात असून शेतकऱ्यांना योग्य ती मदत तातडीने देण्यात येईल. एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही. शेतकरी बांधवांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे आहे, असे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले.

सर्वाधिक बाधित जिल्हे

नांदेड – ६,२०,५६६ हेक्टर,
वाशीम – १,६४,५५७ हेक्टर,
यवतमाळ – १,६४,९३२ हेक्टर,
धाराशिव – १,५०,७५३ हेक्टर,
बुलढाणा – ८९,७८२ हेक्टर,
अकोला – ४३,८२८ हेक्टर,
सोलापूर – ४७,२६६ हेक्टर,
हिंगोली – ४०,००० हेक्टर

बाधित पिके – सोयाबीन, मका, कापूस, उडीद, तूर, मूग या पिकांचे सर्वाधिक नुकसान झाले आहे. काही ठिकाणी भाजीपाला, फळपिके, बाजरी, ऊस, कांदा, ज्वारी व हळद या पिकांनाही फटका बसला आहे.

एकूण बाधित जिल्हे : नांदेड, वाशीम, यवतमाळ, बुलढाणा, अकोला, सोलापूर, हिंगोली, धाराशिव, परभणी, अमरावती, जळगाव, वर्धा, सांगली, अहिल्यानगर, छ. संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, धुळे, जळगाव, रत्नागिरी, चंद्रपूर, सातारा, नाशिक, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, गडचिरोली, रायगड व नागपूर.

# पंजाबमध्ये पूरपरिस्थिती आणखीन बिकट

## मृतांचा आकडा ४३ वर... १६५५ गावे प्रभावित



चंदीगड : पंजाब राज्यात पूरपरिस्थिती आणखीन बिकट झाली आहे. आणखीन सहा जणांना आपला जीव गमवावा लागला असल्यामुळे, मृतांचा आकडा आतापर्यंत ४३ वर पोहोचला आहे. पंजाब सरकारने यासंबंधी जारी केलेल्या परिपत्रकाद्वारे ही आकडेवारी समोर आली आहे. पंजाब १९८८ नंतरच्या सर्वात मोठ्या पुराचा सामना करत आहे.

मृतांमध्ये अमृतसरमधील ४, बरनालामधील ५, होशियारपूरमधील ७, भटिंडामधील ३, गुरुदासपूरमधील १, लुधियानामधील ४, मानसामधील ३, पठाणकोटमधील ६, पटियालामधील १, रूपनगरमधील १ आणि मोहाली आणि संगरूरमधील प्रत्येकी एकाचा समावेश आहे.

सरकारच्या परिपत्रकानुसार, पंजाबमधील २३ जिल्हे आणि १६५५ गावे पुरामुळे बाधित झाली आहेत. पंजाबमधील पुरामुळे बाधित झालेल्या लोकांची संख्या तीन लाख ५५ हजार ७०९ इतके आहे.अमृतसरमध्ये पुरामुळे बाधित झालेल्यांची संख्या १ लाख १७ हजार ५३४ आहे. त्यानंतर गुरुदासपूरमध्ये १ लाख ४५ हजार लोक तर फिरोजपूरमध्ये ३९हजार ०७६, पठाणकोटमध्ये १५हजार ०७३, कपूरथलामध्ये ५ हजार ७२८ आणि मोहालीमध्ये ७ हजार लोक बाधित झाले आहेत.

पुराच्या पाण्यातून वाचविण्यात आलेल्या लोकांची संख्या १९हजार ४७४ वर पोहोचली आहे. गुरुदासपूरमधून सर्वाधिक ५५८१ लोकांना वाचवण्यात प्रशासनाला यश आले. तर अमृतसरमधून २७३४, बरनालामधून ३६९, फाजिल्कामधून २४२२, फिरोजपूरमधून २४९५, गुरुदासपूरमधून ५५८१ लोकांना वाचवण्यात आले. तसेच होशियारपूरमधून १६१५, जालंधरमधून ४७४, कपूरथळामधून १४२८, मानसामधून १६, मोगामधून ११५, रोपरमधून ६५, पठाणकोटमधून ११३९, तरनतारनमधून २१ लोकांना वाचवण्यात आले आहे. अशा प्रकारे एकूण १९ हजार ४७४ लोकांना सुरक्षित ठिकाणी नेण्यात आले आहे. बचाव कार्य करण्यासाठी बाधित जिल्ह्यांमध्ये एनडीआरएफच्या ३१ तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. भारतीय लष्कर आणि हवाई दलाच्या बारा तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत, तर ८ तुकड्या सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. भारतीय हवाई दल आणि लष्कराचे ३० हून अधिक हेलिकॉप्टर बचाव आणि मदतकार्यासाठी तैनात करण्यात आले आहेत.

बीएसएफ देखील राज्य सरकारला बचाव कार्यात मदत करत आहे, तर राज्य सरकारने बचाव कार्यासाठी १२३ बोटी पुरवल्या आहेत.

# एअर इंडियाच्या १६१ प्रवासी असलेल्या विमानाचे तातडीने लँडिंग

इंदूर : एअर इंडियाच्या इंदूर – दिल्ली विमानाने दिल्लीच्या दिशेने प्रवास सुरू केला. उड्डाण करुन विमान दिल्लीच्या दिशेने झेपावले आणि धक्कादायक घटना घडली. विमानाचे एक इंजिन बंद पडले. ज्यावेळी ही घटना घडली त्यावेळी १६१ प्रवासी असलेले एअर इंडियाचे विमान आकाशात होते. पुढील संकट टाळण्यासाठी मार्ग बदलून तातडीने हे विमान इंदूर विमानतळावर उतरवण्यात आले. विमान व्यवस्थित उतरले आणि पुढचे संकट टळले. सर्व प्रवासी सुरक्षित आहेत. विमानाचे बंद पडलेले इंजिन दुरुस्त करण्याचे काम तंत्रज्ञ करत आहेत.

एअर इंडिया एक्सप्रेस –दइ १०२८ विमानाच्या वैमानिकाने एक इंजिन बंद पडल्याचे नियंत्रण कक्षाला कळवले. माहिती मिळताच अग्निशमन दल, रुग्णवाहिका आणि सीआयएसएफ पथकाने विमानतळावर धाव घेतली. सुदैवाने, विमान विमानतळावर सुरक्षितपणे उतरवण्यात आले.

याआधी १२ जून २०२५ रोजी गुजरातमध्ये अहमदाबाद येथे एअर इंडियाच्या बोईंग ७८७ – ८ ड्रीमलायनर विमानाचा अपघात झाला होता. सर्व इंजिन बंद पडल्यामुळे उड्डाण केल्यानंतर अवघ्या काही सेकंदात एअर इंडियाचे विमान एका इमारतीला धडक दिल्यानंतर मेडिकल हॉस्टेलवर कोसळले होते. या दुर्घटनेत एकूण २६० जणांचा मृत्यू झाला आणि ६८ जण जखमी झाले होते.

# वाहत्या पाण्यात गणेश विसर्जनासाठी प्रशासन अलर्ट

तभा वृत्तसेवा

पैठण दि ०५ :- आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप देण्यासाठी पंचक्रोशीसह जिल्ह्यातील गणेश भक्त अनंतचतुर्थी ६ सप्टेंबर शनिवार रोजी पैठणला गोदावरी गंगेत गणेश विसर्जनासाठी येणार असून नाथसागर जलाशयातून गंगापात्रात पाण्याचा मोठा विसर्ग करण्यात येत असल्याने भाविकांच्या सुरक्षिततेसाठी नगर परिषद तथा पोलीस प्रशासन अलर्ट मोडवर असणार आहे. गणेश विसर्जन ठिकाणी पोलीस तसेच नगर परिषद पथक तैनात असणार असल्याची माहिती मुख्याधिकारी तथा प्रशासक डॉ पल्लवी अंभोरे यांनी दिली.

यंदा २६ ऑगस्ट रोजी श्रीक्षेत्रात मोठया उत्सवात श्री गणपती उत्सवाला सुरुवात झाली होती. यात बहुतांश ठिकणी एक गांव एक गणपती संकल्पना राबवण्यात आली. तसेच गेल्या ९ दिवस गणपती बाप्पा समोर मोठा उत्सव पहावयास मिळाला अनेक ठिकाणी सार्वजनिक गणेश मंडळाच्या वतीने सांस्कृतिक व मनोरंजन कार्यक्रमाचे आयोजन भंडारे देण्यात आले. तर छत्रपती शिवाजी महाराज चौकात व बस स्थानक परिसरात धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमा पाठोपाठ माहेश्वरी भक्त निवास येथे प्रसिध्द हास्य अभिनेता भाऊ कदम व टीमच्या नाटकाला पैठणकरांचा प्रतिसाद मिळाला.


गणेश उत्सवाची सांगता होणार असून गणेश मूर्ती विसर्जनासाठी दुधडी भरून वाहणाऱ्या गंगा भागातील नाथसागर जलाशय पायथा, कृष्ण कमल तीर्थ,मोक्ष घाट,पालखी ओटा परिसर, गणेश घाट, नागघाट, सिद्धेश्वर मंदिर ,पाटेगांव पूल आदी ठिकाणी गणेश भक्त मोठी गर्दी करतात.नाथसागर धरणातून गोदावरीत मोठा विसर्ग सुरू असल्याने वरील भागात पोलीस पथक, निर्माल्य संकलन पथक, जलतरण पथक तैनात राहणार आहे.

माहेश्वरी भक्त निवास येथून ते बसस्थानक चौक,छत्रपती शिवाजी महाराज चौक, भाजी मार्केट, नेहरू चौक मार्गे नागघाट अशी शहरातील मनाच्या श्री मूर्तीची विसर्जन मिरवणूक निघणार आहे.यासाठी परिसरातील मशिदी झाकण्यात आल्या आहेत.आमदार विलास बाप्पू भुमरे यांच्या प्रमुख उपस्थितीत मिरवणुकीत सहभागी गणेश मंडळाच्या सदस्याचा सत्कार होणार आहे. गणेश विसर्जन काळात कुठल्याही प्रकारची हुल्लडबाजी चालणार नसून यासाठी गणेश भक्तांनी पारंपरिक वाद्यांत व कमी डेसीबल साउंड मध्ये शांततेत गणेश विसर्जन करावे असे आवाहन पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांनी केले आहे.

# ‘शब्दांची हेराफेरी केली’, भुजबळांचा सरकारला थेट इशारा; ’हैदराबाद गॅझेट’वरुन आक्रमक

मुंबई: राज्य सरकारने मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी काढलेल्या ’हैदराबाद गॅझेट’च्या जीआरवरून राज्य सरकारमधील मंत्री छगन भुजबळ यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण मागे घेतल्यानंतर हा जीआर ओबीसी समाजासाठी धोकादायक असल्याचे मत भुजबळ यांनी पुन्हा एकदा ठामपणे मांडले आहे. एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी थेट आपल्याच सरकारला इशारा दिला असून, गरज पडल्यास न्यायालयात जाण्याचा संकेतही दिला आहे. भुजबळ म्हणाले, तासाभरात दोन-दोन जीआर निघतात. ’सरसकट’ या शब्दावर आक्षेप घेतला जाऊ शकतो, म्हणून तो शब्द काढून शब्दांची हेराफेरी केली गेली. याच कारणामुळे जरांगे पाटील परत गेले आणि त्यांनी विजयाचा गुलाल उधळला, असेही त्यांनी सांगितले. ओबीसी आरक्षणाचे नेते म्हणून ओळखले जाणारे भुजबळ, या जीआरमुळे ओबीसी समाजाचे मोठे आणि कधीही भरून न निघणारे नुकसान होईल अशी भीती व्यक्त करत आहेत. मराठ्यांना ओबीसींमध्ये सरसकट आरक्षण देण्याचा प्रयत्न होत आहे, असा त्यांचा आरोप आहे. यावर बोलताना त्यांनी २०१७ नंतरच्या घटनाक्रमांचा संदर्भ दिला. २०१९ पूर्वी मराठा, गुज्जर आणि जाट समाजाचे मोर्चे निघाले होते. त्यानंतर मोदी सरकारने ईडब्ल्यूएस (एथड) वर्ग निर्माण केला. ज्या समाजांना सामाजिकदृष्ट्या मागास मानले जात नाही, पण ते आर्थिकदृष्ट्या मागास आहेत, त्यांना ५० टक्क्यांच्या बाहेर १० टक्के आरक्षण दिले. पण, १० टक्क्यांत एकटा मराठा समाजच ८ टक्के आहे. तरीही त्यांचा ओबीसी आरक्षणासाठी आग्रह कायम आहे.

# ज्येष्ठ विचारवंत पद्मश्री रमेश पतंगे यांना वाल्मिकी पुरस्कार जाहीर



छत्रपती संभाजीनगर –

हिंदू रिसर्च फाउंडेशन ही नागपूरस्थित स्वयंसेवी संस्था २०२२ पासून समाजाच्या विविध क्षेत्रांत मोलाचे योगदान देणार्या व्यक्तींना दरवर्षी वेदकाळातील सप्तर्षींच्या नावे पुरस्कार देते. विश्वकर्मा, महर्षी वाल्मिकी, आचार्य भारद्वाज, आचार्य कणाद, आचार्य सुश्रुत, नागार्जुन आणि आर्यभट्ट या सात ऋषींच्या नावे हे पुरस्कार आहेत. अल्पावधीतच प्रतिष्ठा प्राप्त झालेल्या या पुरस्कारांमधील ऋषी वाल्मिकी यांच्या नावे दिला जाणारा २०२५ चा पुरस्कार, हिंदुस्थान प्रकाशन संस्थेचे अध्यक्ष, साप्ताहिक विवेकचे माजी संपादक, ज्येष्ठ विचारवंत पद्मश्री रमेश पतंगे यांना घोषित झाला आहे. रमेश पतंगे यांनी लेखनाच्या माध्यमातून गेली अनेक दशके केलेल्या वैचारिक प्रबोधनाच्या कार्याची ही आणखी एक पोचपावती आहे. या पुरस्काराने विवेक समूहाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. हा पुरस्कार येत्या ५ ऑक्टोबर रोजी नागपूर येथे समारंभपूर्वक देण्यात येईल. यापूर्वी हा वाल्मिकी पुरस्कार पद्मविभूषण डॉ. एस. एल. भैरप्पा आणि महाकवी सुधाकर गायधनी यांना प्रदान करण्यात आलेला आहे.

जगभरातील सर्व मानव आणि विशेषत: हिंदू धर्माच्या अनुयायांच्या धर्मादाय, शैक्षणिक, नैतिक, सामाजिक-आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी एक व्यासपीठ आणि निधी उभारणे, सार्वजनिक व्याख्याने, चर्चासत्रे, संगोष्ठी, संशोधन उपक्रम, शास्त्रार्थ इत्यादी आयोजित करून हिंदू धर्माचा प्रचार करणे, हिंदू तत्त्वज्ञानाचा अधिक वैज्ञानिक, संघटित आणि प्रामाणिक पद्धतीने सखोल अभ्यास सुलभ करण्यासाठी हिंदू अभ्यासासाठी अध्यासन स्थापन करणे, विज्ञान, साहित्य आणि अध्यात्माच्या विविध क्षेत्रात योगदान देणार्या प्राचीन संत आणि ऋषींच्या नावाने नोबेल पुरस्कारांच्या सदृश्य पुरस्कार देणे, आदी उद्दिष्ट्ये घेऊन हे फाउंडेशन कार्यरत आहे. डॉ. टि. एस. भल हे फाउंडेशनचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय विश्वस्त आहेत आणि अन्य विश्वस्त हे विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी आहेत.

## अग्रलेख...

# अमृतकाळाची अमृतयात्रा...

जेमतेम दीड महिन्यापूर्वी, १५ ऑगस्ट रोजी देशाच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिन सोहळ्यात लाल किल्ल्यावरून देशाला उद्देशून केलेल्या भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वस्तू आणि सेवा करांच्या अधिक सुसूत्रीकरणाचा आणि या करांच्या आकारणी स्तरामध्ये नवीन सुधारणा करण्याचा मनोदय बोलून दाखविला होता. सामान्य माणसाचे जीवनमान सुलभ करणे आणि अर्थव्यवस्थेला अधिक मजबुती देणे हा त्यामागचा उद्देश असल्याचेही त्यांनी सांगितले होते आणि त्यापाठोपाठ केंद्र सरकारने व्यापक-आधारावर जीएसटी दरांचे सुसूत्रीकरण आणि प्रक्रिया सुधारणांसाठी एक सविस्तर प्रस्तावही तयार केला होता. केंद्र आणि राज्यांचा समावेश असलेल्या जीएसटी परिषदेने वस्तू आणि सेवा करांच्या सुधारित आवृत्तीचा नवा प्रस्ताव बुधवारी एकमताने संमत केला आणि पंतप्रधानांनी स्वातंत्र्य दिनी दिलेली एक ग्वाही वास्तवात अवतरली. सामान्य माणूस, शेतकरी, मध्यम व लघु उद्योग, मध्यमवर्गीय समाजघटक, महिला आणि युवकांना या निर्णयाचा लाभ होईल, व्यापक सुधारणांमुळे नागरिकांचे जीवनमान सुधारेल आणि सर्वांसाठी, विशेषतः छोटे व्यापारी आणि व्यवसायांसाठी व्यवसाय सुलभता सुनिश्चित होईल, अशा शब्दांत पंतप्रधानांनी बुधवारी जीएसटी परिषदेच्या मान्यतेनंतर समाधान व्यक्त केले. सामान्य माणूस, कामगार-केंद्रित उद्योग, शेतकरी आणि शेती, आरोग्य, अर्थव्यवस्थेचे प्रमुख चालक यावर लक्ष केंद्रित करून नव्या दरांचे सुसूत्रीकरण करण्यात आले आहे, अशा प्रतिक्रिया बुधवारी नव्या करआकारणीस मान्यता मिळाल्यावर सत्ताधाऱ्यांकडून व्यक्त केल्या गेल्या. सध्याच्या चार-स्तरीय कररचनेचे सुसूत्रीकरण करून १८ टक्के आणि पाच टक्के अशी द्विस्तरीय रचना करून अगोदर लागू असलेले १२ आणि २८ टक्के दराचे स्तर रद्द करण्यात आले आहेत. काही निवडक वस्तू आणि सेवांसाठी ४० टक्के विशेष दर आकारण्यात येईल, पण त्याचा बोजा सामान्य माणसाच्या दैनंदिन गरजांवर पडणार नाही, उलट केसांचे तेल, साबण, शाम्पू, टुथब्रश, टुथपेस्ट, सायकल, स्वयंपाकाची भांडी आणि इतर दैनंदिन वापरातील वस्तूंवरील कर कमी झाल्याने सामान्य माणसाचा अर्थसंकल्प अधिक सोपा होईल. पाकीटबंद खाद्यपदार्थ, भुजिया, सॉस, पास्ता, इन्स्टंट नूडल्स, चॉकलेट, कॉफी, कॉर्नफ्लेक्स, बटर, तूप, इत्यादीवरील कर कमी झाल्याने कुटुंबांच्या जीवनशैलीला नवतेचा स्पर्श अधिक सुखावणारा ठरू शकतो.

शेतकरी, कष्टकरी हा देशाच्या विकासाच्या वाटचालीतील महत्त्वाचा घटक असल्याचा दावा पंतप्रधान वारंवार करत असतात. ट्रॅक्टर, माती तयार करण्यासाठी किंवा लागवडीसाठी कृषी, फलोत्पादन किंवा वनीकरण यंत्रसामग्री, कापणी किंवा मळणीची यंत्रसामग्री, खत तयार करणारी यंत्रे इत्यादींचा समावेश असलेल्या कृषी वस्तूंवरील जीएसटी १२ टक्क्यांवरून ५ टक्क्यांवर आणून शेतकऱ्याचे जगणे सोपे करण्याच्या प्रयत्नांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्नही नव्या रचनेतून करण्यात आला आहे. गेल्या १०-१२ वर्षांतील देशाच्या आर्थिक क्षितिजावर उजळणाऱ्या प्रगतीच्या दीपमाळा आता सर्वांना स्पष्ट दिसू लागल्या आहेत. त्याच्या प्रकाशवाटेवरून अमृतकाळाची अमृतयात्रा पुढच्या टप्प्यावरील वाटचालीसाठी सिद्ध झाली आहे. देशाला पुढे न्यायचे असेल, तर भारताला आधुनिकतेचे अनुकरण करण्याखेरीज पर्याय नाही, असा पंतप्रधान मोदी यांचा आग्रह असतो. मात्र, आधुनिकतेच्या या वाटचालीसोबत परंपरांचा सन्मानही झाला पाहिजे, यासाठीदेखील केंद्र सरकार आग्रही दिसते. आता वेळ न दवडता आधुनिकतेच्या मार्गावरील वाटचालीची गती वाढविण्याची गरजही पंतप्रधानांनी वारंवार बोलून दाखविली आहे. कारण स्वातंत्र्यानंतरची तब्बल ६७ वर्षे, सन २०१४ पर्यंतची वाटचाल काहीशी संथ राहिली, हे आकडेवारीनिशी स्पष्ट झाले आहे. या काळात देशाचे स्थूल राष्ट्रीय उत्पन्न केवळ २.०४ ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचले होते. या सुधारणा केवळ देशाची आर्थिक स्थिती बळकट करण्याच्या उद्दिष्टांपुरत्या मर्यादित नव्हत्या. एक मजबूत पायाभूत रचना उभी करून त्यावर भक्कम, आत्मविश्वासपूर्ण, आत्मनिर्भर आणि स्वदेशाभिमानी भारताची सशक्त अर्थव्यवस्था उभी करण्याचे उद्दिष्ट या प्रत्येक योजनेच्या मुळाशी रुजविलेले होते. या सुधारणांपैकी महत्त्वाचा टप्पा वस्तू आणि सेवा करांच्या आकारणीतून, १ जुलै २०१७ रोजी सुरू झाला. तब्बल १७ वर्षे देशाला अशा कररचनेची प्रतीक्षा होती. ती संपुष्टात आली आणि आर्थिक सुधारणांच्या दिशेने मोठी झेप घेत देशाने जपानच्या अर्थव्यवस्थेस मागे टाकून जागतिक अर्थविश्वाचे लक्ष वेधून घेतले. ही केवळ सुरुवात होती. सकल राष्ट्रीय उत्पन्न वाढविणे हा केवळ आकडेवारीचा खेळ नसतो. आधी विकासाचे मोजमाप केवळ आकडेवारीच्या आधारावर केले जात असे. मुळात आकडेवारीच्या आधारावर उभे राहून भविष्य घडविता येत नाही. त्यासाठी वर्तमानाला योग्य दिशा देणे आवश्यक असते. म्हणूनच आता विकासाचे मोजमाप आकडेवारीवर न होता, जीवनात घडून येणाऱ्या बदलामधून मोजले जाते. त्याचा सर्वात मोठा परिणाम देशातील जनतेच्या जीवनमानातून दिसणे गरजेचे असते. आता एक गृहिणी रोजगाराची साधने निर्माण करू शकते, एक शेतकरी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून शेतामध्ये नवनवे प्रयोग करू पाहता आणि अनेक स्वयंपाकघरे आधुनिक रसोईघरे म्हणून उभी राहात आहेत. म्हणूनच देशातील २५ कोटी लोकसंख्येच्या कपाळावरील गरिबी रेषा पुसली गेली, तेव्हा जनतेचे जीवनमान सुधारणाऱ्या विकासाच्या प्रारूपातून उगम पावलेल्या या प्रगतीची साक्ष पटली आणि सहा दशकांपर्यंत जगातील ११ व्या स्थानावरील अर्थव्यवस्था असलेला भारत आज ४.१९ ट्रिलियन डॉलर्सची भक्कम अर्थव्यवस्था उभारून जगातील चौथ्या क्रमांकाची आर्थिक शक्ती ठरल्याचा निर्वाळा जागतिक नाणेनिधीने दिला. गेल्या आठ वर्षांतील आर्थिक प्रगतीच्या या वाटचालीचा उभा देश साक्षीदार झाला आहे आणि जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था म्हणून नव्या वाटचालीची सुरुवातही उभे जग न्याहाळते आहे. जागतिक स्तरावरील आर्थिक अनिश्चिततेच्या काळातही भारताच्या अर्थव्यवस्थेचा पाया वाढीच्या स्थिर वेगावर मजबूत उभा आहे. ही वाढ मुख्यतः खाजगी क्षेत्रातील वाढती उलाढाल, ग्राहकांची वाढलेली क्रयशक्ती आणि उत्पादनांना असलेली वाढती मागणी, सार्जनिक क्षेत्रांतील गुंतवणूकदारांचा वाढता विश्वास या सर्वांच्या एकत्रित परिणामांतून साधली गेली आहे, असा निःसंदिग्ध निर्वाळा संयुक्त राष्ट्रांच्या अर्थतज्ज्ञांकडून मिळाल्याने जगानेही भारताच्या प्रगतीच्या वाटचालीस मान्यता दिली आहे.

सुमारे एक तपापूर्वी, सन २०१३ मध्ये भारताची जागा कमजोर आणि अस्थिर अर्थव्यवस्था असलेल्या देशांच्या रांगेत होती. गेल्या काही वर्षांत हे चित्र बदलले आहे. अर्थविश्वात भारताने आपली स्वतःची ओळख उभी केली आहे. सर्वप्रथम महागाई नियंत्रणात आणण्याचे आखणीबद्ध प्रयत्न सुरू झाले आणि जागतिक महागाईच्या क्रमवारीत २१३ मध्ये १४२ व्या क्रमांकावर असलेला भारत ६३ व्या स्थानापर्यंत येऊन पोहोचला. वित्तीय तूट कमी करण्याच्या पुढच्या पावलाचे परिणामही दिसू लागले. कररचना सुलभ करणे हा त्याचाच एक भाग होता. एकसंघ करप्रणालीमुळे लोकांना परवडणाऱ्या दरात कर्जे उपलब्ध होऊ लागली, हा अर्थव्यवस्थेच्या सकारात्मक वाटचालीचाच परिणाम म्हणता येईल. सुलभ अर्थसाह्य उभे करण्याचा विश्वास वाढू लागल्याने, व्यवसाय करण्यातील धोक्यांना घाबरणारा क्रियाशील समाजघटक आज नव्या व्यवसायांत धाडसाने उतरताना दिसू लागला आहे. विकासाच्या वाटचालीतील आपल्या कर्तव्याचा वाटा उचलण्यासही सिद्ध झाला आहे.

आठ वर्षांपूर्वी ३० जून आणि २ जुलै २०१७ च्या मध्यरात्री देशात वस्तू आणि सेवा करांची अंमलबजावणी सुरू झाली. 'गुड अँड सिम्पल टॅक्स' असे याचे वर्णन करून देशाच्या अर्थविश्वात क्रांतीचे नवे पर्व सुरू झाल्याची भावना पंतप्रधानांनी व्यक्त केली होती. काही विरोधकांनी या करआकारणीवर टीकेची झोड उठविलीच; पण आता १७ वर्षांच्या जीएसटी आकारणीच्या स्वप्नापासून संकल्पपूर्तीपर्यंतच्या प्रवासाने देशाला नवी दिशा दिल्याचे सिद्ध झाले आहे. देशाच्या हितासाठी कोणतीही मोठी जोखीम घेण्याची आमच्या सरकारची तयारी आहे, असे पंतप्रधानांनी जाहीर केले आहे. पण डोळे मिटून अंधारात उडी मारण्याच्या आवेशात अशी जोखीम घेतली जाणार नाही, हे या वाटचालीने सिद्ध केले आहे. अमृतकाळात सुरू झालेल्या या अर्थव्यवस्थेच्या अमृतयात्रेतून देश उत्कर्षाच्या शिखरापर्यंत पोहोचेल, असा विश्वास मनामनात रुजण्यासाठी आणखी कोणते पुरावे हवेत?

## दृष्टिक्षेप

# आर्थिक मंथन आणि विकासाचे अमृत

**हरदीप सिंग पुरी**

भारतीय संस्कृतीत अशी विचारधारा आहे की, एखाद्या गोष्टीच्या पूर्वचाचणीने विजय निश्चित होतो. ज्याप्रमाणे समुद्र मंथनाने अर्थात समुद्रात झालेल्या मंथन क्रियेनंतर अमृत प्राप्ती झाली त्याप्रमाणे आपल्या आर्थिक मंथनाने नेहमीच जीवनदान दिले आहे. १९९१ मधील आर्थिक संकटाने उदारीकरणाचा उदय झाला तर महामारीने डिजिटल क्षेत्रात नवीन लाट आली आणि भारताला एक मृत अर्थव्यवस्था म्हणणाऱ्या शंकेखोरांच्या बतावणीपासून आज जलद वाढ, मजबूत संरक्षण आणि विस्तृत संधी असलेली स्थैर्याची तथ्यांनी समृद्ध कहाणी समोर आहे.

अगदी अलिकडची जीडीपीची आकडेवारी बघूया. वास्तविक जीडीपीने २०२५-२६ आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत ७.८ टक्के वाढ नोंदविली असून ती गेल्या पाच तिमाहींमध्ये सर्वोच्च आहे. महत्त्वाचे म्हणजे, ही वाढ व्यापक आहे. एकूण मूल्यवर्धित अर्थात जीव्हीएमध्ये ७.६ टक्के वाढ झाली आहे. उत्पादनात ७.७ टक्के, बांधकामात ७.६ टक्के आणि सेवा क्षेत्रात सुमारे ९.३ टक्के वाढ झाली आहे. ही वाढ अतार्किक नव्हे, तर यामधून वाढत जाणारा वापर, चैतन्यदायी गुंतवणूक आणि सार्वजनिक भांडवली खर्चातून होणारा स्थिर खर्च तसेच परिचालनात्मक सुधारणांमुळे अर्थव्यवस्थेतील खर्चाचे प्रमाण कमी झाले आहे, हे प्रतिबिंबित होत आहे.

भारत आता जगातील सर्वात मोठी चौथी अर्थव्यवस्था आहे आणि वेगाने विकसित होणारी मोठी अर्थव्यवस्था आहे. अमेरिका आणि चीन या जगातील पहिल्या आणि दुसऱ्या सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थांच्या गतीला मागे टाकत आहे. सध्याच्या वाटचालीनुसार, आपण हे दशक संपण्यापूर्वी जर्मनीला मागे टाकून बाजार-विनिमयाच्या बाबतीत तिसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्यास सज्ज आहोत. आपली गती संपूर्ण जगावर प्रभाव टाकत आहे, स्वतंत्र आकडेवारीनुसार भारत आताच जागतिक वाढीच्या १५ टक्क्यांपेक्षा अधिक योगदान देत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची महत्त्वाकांक्षा स्पष्ट आहे. धोरणे अधिकाधिक खोलवर राबवताना आणि नवीन क्षमता ऑनलाईन होताना भारताची हिस्सेदारी २० टक्क्यांपर्यंत वाढवायची आहे. बाजारपेठा आणि मानांकन संस्थांनी याला मान्यता दिली आहे. एस अँड पी ग्लोबल एजन्सीने १८ वर्षांत भारताचे पहिले सार्वभौम रेटिंग वाढविले आहे, ज्यात मजबूत वाढ, चलनविषयक विश्वासार्हता आणि राजकोषीय एकत्रीकरण यांचा उल्लेख केला गेला. त्या सुधारणामुळे कर्ज घेण्याचा खर्च कमी होतो आणि गुंतवणूकदारांचा आधार वाढतो. हे 'मृत अर्थव्यवस्थेच्या' कथेला छेद देते. जोखीम मूल्यांकनकर्त्यांनी त्यांच्या रेटिंगसह मतदान केले आहे.



भारताचा पेट्रोलियम मंत्री या नात्याने आपली ऊर्जा सुरक्षा या जलद वृद्धीला कशी पूरक पाठबळ देते, ते मी सांगू शकतो. भारत आज जगातील तिसरा सर्वात मोठा ऊर्जा ग्राहक, चौथा सर्वात मोठा रिफायनर आणि चौथा सर्वात मोठा एलएनजी आयातदार देश आहे. आम्ही दररोज ५.२ दशलक्ष बॅरलपेक्षा जास्त शुद्धीकरण क्षमता वापरतो, दशकाच्या अखेरीस ती ४०० एमटीपीएपेक्षा जास्त वाढविण्याचा स्पष्ट पथदर्शी निर्धार आहे. भारताची ऊर्जेची मागणी जी २०४७ पर्यंत दुप्पट होईल, असा अंदाज आहे. हे वाढत्या जागतिक मागणीच्या जवळजवळ एक चतुर्थांश असेल, ज्यामुळे आपले यश जागतिक ऊर्जा स्थिरतेचे केंद्रबिंदू बनेल. सुरक्षा आणि धोरण यांची सांगड घालणे असा केंद्र सरकारचा दृष्टिकोन आहे. २०२१ मध्ये भारताचा उत्खनन वाटा गाळयुक्त खोऱ्यांच्या ८ टक्क्यांवरून २०२५ मध्ये टक्क्यांपर्यंत वाढले आहे तर २०३० पर्यंत १ दशलक्ष चौरस किमी व्यापण्याचे उद्दिष्ट आहे. तथाकथित 'नो-गो' क्षेत्रांमध्ये ९९ टक्क्यांनी मोठी घट केल्याने अफाट क्षमता खुल्या झाल्या आहेत, तर ओपन एकरेज लायसन्सिंग पॉलिसी (ओएएलपी) मुळे पारदर्शक आणि स्पर्धात्मक बोली प्रक्रिया सुनिश्चित झाली आहे. सुधारित गॅस किंमत प्रणालीनुसार भारतीय कच्च्या तेलाच्या किमतींशी जोडणे, खोल पाण्यातील आणि नवीन विहिरींसाठी २० टक्के प्रीमियम देणे यासारख्या उपक्रमांमुळे गुंतवणुकीला चालना मिळाली आहे. भारताने रशियाकडून खरेदी केलेल्या इंधनामुळे जगाच्या काही भागात वातावरण तप्त झाले होते. आता गदारोळ आणि आवाज यांच्यातील फरक जाणून घेऊया. रशियन तेलावर कधीही इराणी किंवा व्हेनेझुएलाच्या कच्च्या तेलाप्रमाणे बंदी घालण्यात आली नाही; ते जी७/ईयू किंमत-कॅप सिस्टिम अंतर्गत आहे, जे जाणूनबुजून तेलाचा प्रवाह चालू ठेवण्यासाठी आणि महसूल मर्यादित करण्यासाठी संरचित केलेले आहे. अशा पॅकेजेसच्या १८ फेऱ्या झाल्या आहेत आणि भारताने त्या प्रत्येकाचे पालन केले आहे. प्रत्येक व्यवहारात कायदेशीर शिपिंग आणि विमा, अनुपालन करणारे व्यापारी आणि ऑडिट केलेले मार्ग वापरले गेले आहेत. आम्ही नियम मोडलेले नाहीत; आम्ही बाजारपेठा स्थिर ठेवल्या आहेत. जागतिक किमती वाढण्यापासून रोखल्या आहेत.

काही टीकाकारांचा असा आरोप आहे की, भारत रशियन तेलासाठी 'लँड्रोमॅट' बनला आहे. सत्यापेक्षा मोठे काहीही असू शकत नाही. भारत हा कित्येक दशकांपासून पेट्रोलियम उत्पादनांचा चौथा सर्वात मोठा निर्यातदार होता. या संघर्षाच्या खूप आधीपासून आणि आपले रिफायनर्स जगभरातून मोठ्या प्रमाणात कच्च्या तेलावर प्रक्रिया करतात. निर्यातीमुळे पुरवठा साखळी खरोखर कार्यरत राहते, रशियाच्या तेलावर बंदी घातल्यानंतर युरोप स्वतः भारतीय इंधनाकडे वळला आहे. निर्यातीचे प्रमाण आणि शुद्धीकरण मार्जिन (जीआरएम) स्थूलमानाने सारखेच आहेत; नफेखोरीचा प्रश्नच उद्‌भवत नाही. सार्वजनिक क्षेत्रातील तेल कंपन्यांना डिझेल मागे प्रति लिटर १० रुपये तोटा सहन करावा लागला, केंद्र सरकारने केंद्रीय आणि राज्य स्तरावरील कर कमी केले आणि निर्यातविषयक नियमांत सुधारणा करून परदेशात पेट्रोल आणि डिझेलची विक्री करणाऱ्या शुद्धीकरण करणाऱ्या कंपन्यांनी देशांतर्गत बाजारपेठेत कमीत कमी ५० टक्के पेट्रोल आणि ३० टक्के डिझेलची विक्री करावी, असे आदेश जारी करण्यात आले.

सर्वात मोठे सत्य असे आहे की, जगातील दुसऱ्या सर्वात मोठ्या उत्पादकाला जो जागतिक पातळीवर १० टक्के तेलाचा पुरवठा करतो, त्यासाठी दुसरा पर्याय उपलब्ध नाही. त्यामुळे जे आपल्याकडे बोट दाखवत आहेत, ते या वस्तुस्थितीकडे डोळेझाक करत आहेत. आपल्या 'वसुधैव कुटुंबकम्' या संस्कृतीच्या मूल्यांशी सुसंगत राहून भारताने सर्व आंतरराष्ट्रीय नियमांचे पालन केल्यामुळे प्रति बॅरल २०० डॉलर्सचा मोठा फटका रोखला गेला. भारतात आकार घेऊ पाहत असलेल्या औद्योगिक क्रांतीला साकारणाऱ्या जागतिक दृष्टिकोनासाठी हा तोच मेड इन इंडियाचा दूरदर्शी संकल्प आहे, जे सेमीकंडक्टर, इलेक्ट्रॉनिक्स, अक्षय ऊर्जा, संरक्षण आणि विशेष रसायने यांना व्यापून उरला आहे. याला जोड आहे ती पीएलआय प्रोत्साहन अर्थात उत्पादन आधारित प्रोत्साहन आणि पीएम गतिशक्ती लॉजिस्टिक्सच्या भक्कम आधाराची. सेमीकंडक्टर क्षेत्राच्या वेगाने आता नवीन उंची सर केली आहे. धोरण गांभीर्य आणि अंमलबजावणीचे ते एक उत्तम उदाहरण आहे. भारत सेमीकंडक्टर मोहिमेंतर्गत चार अतिरिक्त सेमीकंडक्टर उत्पादक प्रकल्पांना, केंद्रीय मंत्रिमंडळाने नुकतीच मंजुरी दिली आहे. पुढचा मार्ग आशादायक आहे. स्वतंत्र अंदाज असे सूचित करतात की, २०३८ पर्यंत भारत पीपीपीच्या बाबतीत जगातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था म्हणून उदयास येऊ शकतो. मोदी यांच्या नेतृत्वाखाली, विकसित भारत एक साध्य करण्यायोग्य योजना आहे

(लेखक केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री आहेत.)

## वेध

**रेवती जोशी-अंधारे**

# गणपती विसर्जनाचे शास्त्र

उण्यापुऱ्या १३३ वर्षांची परंपरा असलेला गणेशोत्सव आता महाराष्ट्र राज्य उत्सव झाला आहे. घरोघरी, गल्लीबोळात हजारोंच्या संख्येत श्री गणेशाच्या मूर्तींची प्राणप्रतिष्ठा होते. लोकमान्य टिळकांनी ज्या उद्देशाने सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात केली ते आज नसले तरी त्यांची जागा घेणारी नवी उद्दिष्टे आपण स्थापित करू शकलो नाही, हे सत्य स्वीकारावे लागेल. आपल्या हिंदू धर्माला विज्ञानाचे अधिष्ठान आहे, निसर्गाची बूज राखून सण साजरे करण्याचा संस्कार आहे. म्हणूनच, गणेशोत्सवाच्या सार्धशतीकडे वाटचाल करताना, निसर्गाप्रति आपल्या जबाबदारीसोबतच मर्यादांचा विचार करून निर्णय घेण्याची वेळ आहे.

मग काय आम्ही सण साजरा करायचाच नाही का? आम्हालाच हे ज्ञान सांगता, इतर धर्मीयांचे काय? असे प्रश्न उपस्थित होतील. त्यावर एकच उत्तर आहे आणि ते म्हणजे हिंदूएवढा जबाबदार आणि स्थितिसापेक्ष बदल स्वीकारणारा समाज दुसरा कुठलाही नाही. मध्ययुगात जगणाऱ्यांना असू द्या तिथेच! प्लॅस्टर ऑफ पॅरिस, रासायनिक रंग, सजावटीचे थर्माकोल, नकली दागिने, मातीचे प्रकार, मूर्तीचे आकार, उंची, महाप्रसादासाठी प्लॅस्टिकच्या ताटवाट्या आणि अशा अनेक वस्तूंच्या संदर्भात गणेशोत्सवाचा विचार ही तातडीची गरज आहे. अवाढव्य मूर्तींची स्थापना करणाऱ्या मंडळांच्या सदस्यांनी सामाजिक भान जागे ठेवून, मूर्तीच्या उंची आणि एकूणच आकारावर स्वयंस्फूर्तीने निर्णय घ्यावा. लहान मूर्ती मांडली म्हणून भक्ती-श्रद्धा कमी होत नाही. पण, त्यामुळे दर्शनाला येणाऱ्या भाविकांची रांग लागणार नाही, मंडळाचे उत्पन्न घटेल, सेलिब्रिटी येणार नाहीत, राजकीय नेतृत्त्वाचीही उणीव भासेल. मात्र, पर्यावरण जपल्याचे समाधान मिळेल. महत्त्वाचे म्हणजे आज ना उद्या हे निर्णय आपल्याला घ्यावेच लागणार आहेत. सरकारी यंत्रणा, न्यायालयीन प्रक्रिया, पोलिसांची कारवाई इतका द्राविडी प्राणायाम करण्यापेक्षा आपण स्वतःहूनच असे निर्णय घेणे श्रेयस्कर आहे. कोणत्याही मूर्तीचे नैसर्गिक जलस्रोतांमध्ये विसर्जन निसर्गनियमांना धरून नाही. पीओपी असो की चिकण माती, भूजलातील नैसर्गिक झरे बुजविण्याचे काम ती करते. कृत्रिम हौदांमध्ये, घरी टाक्यात, बादलीत किंवा मोठ्या पिंपात मूर्तीचे विसर्जन करणे, हा सर्वोत्तम पर्याय ठरू शकतो. शास्त्रानुसार, पार्थिव मूर्तीचे विसर्जन तिच्या मूळ स्वरूपात म्हणजे जलतत्वात करावे, असे सांगितले आहे. ते करताना मूर्ती पाण्यात पूर्ण बुडणे अपेक्षित आहे. आपण किमान १० फूटांच्या वर उंचीच्या मूर्ती मांडतो. इतक्या खोलीचा जलसाठा आपल्याकडे आहे का? त्यात किती मूर्ती विसर्जित होऊ शकतील? मूर्ती विसर्जित होतील की, दुसऱ्या दिवशी मूर्तीचे अवयव आणि लाकडी पाट्या पाण्यावर तरंगतील? याचा ताळमेळ आपण नाही तर कोण मांडणार? यंदा नागपुरात ५१ फूट उंच श्री गणेश मूर्तीची स्थापना झाली. गणरायाची दैनंदिन पूजा, हार घालणे वगैरे टास्क, अग्निशमन दलाच्या शिड्या वापरूनच करावे लागले. खरा प्रश्न विसर्जनाचा! मूर्तीकाराने लाकडी आराखड्यावर मातीचे तुलनेने पातळ लेपन करून मूर्ती तयार केली आहे. शिवाय, मूर्तीच्या आत प्लॅस्टिकचे किमात ८-१० पाईप घालून त्यांची तोंडे बाहेरच्या बाजूने उघडी ठेवली आहेत. हे पाईप देवाच्या विविध अवयवांमध्ये आहेत. विसर्जनाच्या वेळी बाहेरच्या तोंडातून या पाईपमध्ये एकेक करून पाणी सोडले जाईल आणि जागेवरच मूर्तीचे विसर्जन होईल. आता हा प्रयोग प्रत्यक्षात किती यशस्वी होतो, हे बघावे लागेल. मूर्तीची विटंबना न होता, जागेवरच श्रीगणेश निराकार होणार असतील, तर भविष्यात मोठ्या प्रमाणावर असे प्रयोग राबविता येतील. मोठ्या मूर्ती घडविण्यासह नैसर्गिक जलस्रोतही सुरक्षित ठेवता येतील. गोमय, कागदाचा लगदा यापासून बनविलेल्या गणेशमूर्तींचा पर्यायी विचार आवश्यक आहे. या मूर्ती घरीच विसर्जित करून, मातीचा पुनर्वापर करता येईल. त्यात फुलझाडं वगैरे लावण्याचे किंवा खत बनविण्याचे पर्याय आहेत. नैसर्गिक जलस्रोतांचे तंत्र बिघडले की काय होतं किंवा होऊ शकतं, हे उत्तर भारतातील पूरस्थितीवरून लक्षात येईल. राजधानी दिल्लीतही स्थिती वेगळी नाही. तुलनेने मैदानी भाग सुरक्षित असले तरी विदर्भातही शहरांमध्ये पाणी साचायला एक जोरदार पाऊस पुरेसा असतो, हे आपण अनुभवत आहोत. तलाव-विहिरींच्या नियमित गाळ उपशासह, आपल्या बाप्पाचे सुरक्षित आणि विचारपूर्वक विसर्जन हे नवे शास्त्र आपल्याला अंगीकारावे लागणार आहे. तरच पुनरागमनायच... म्हणण्यास आपण पात्र राहू!



९८५०३३९२४०

## विशेष

# निंदा स्तुती न घे...

**रमेश पतंगे**

मराठा आंदोलन राज्यशक्तीचा वापर करून दाबून टाकणे फार अवघड नव्हते. मुंबईत येणाऱ्या सर्व वाटा ते रोखू शकले असते. आंदोलकांवर मध्यरात्री पोलिस घालून सर्वांची उचलबांगडी करता येणे शक्य होते. राज्यबळाचा वापर करायचा नाही, संयम ठेवायचा, मानसिक संतुलन ढळू द्यायचे नाही, परिस्थितीचा अभ्यास करीत राहायचा, सहकाऱ्यांना बरोबर घ्यायचे, त्यांचा विश्वास संपादन करायचा आणि त्यांच्या सहकार्याने योग्य निर्णय करायचा, हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठरविले आणि करून दाखविले. पहिल्या श्रेणीच्या राजकीय नेत्याच्या जीवनात त्याच्या नेतृत्वगुणाची कसोटी पाहणारे अनेक प्रसंग येतात. याप्रसंगी त्या नेत्याचे धैर्य, चिकाटी, मानसिक संतुलन, निर्णयक्षमता, नैतिक मूल्यांची जपवणूक, सर्व प्रकारची माहिती गोळा करण्याची क्षमता आणि योग्य वेळी योग्य निर्णय करण्याचीदेखील क्षमता या सर्वांची कसोटी लागते. या कसोटीस जो उतरतो, त्याच्या राजकीय जीवनाचा प्रवास हा उत्तरोत्तर वरच्या श्रेणीत जाणारा असतो. या बाबतीत भारतातील आणि जगातील अनेक राजनेत्यांची उदाहरणे लक्षात घेण्यासारखी आहेत. सरदार वल्लभभाई पटेल, इंदिरा गांधी ही दोन भारतातील राजकीय नेतृत्वाची मोठी नावे आहेत. जर्मनीचे एकीकरण करणारा ऑटो व्हॉन बिस्मार्क, इटलीचा गॅरिबाल्डी, ब्रिटनचा ऑलिवर क्रॉमवेल, विन्स्टन चर्चिल, अमेरिकेचे जॉर्ज वाशिंगटन, अब्राहम लिंकन, रूझवेल्ट, असे थोर पुरुष वर दिलेल्या सर्व नेतृत्वगुणात श्रेष्ठ ठरले आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना या सर्व नेत्यांच्या पंक्तीत नेऊन बसवणे आज घाई होईल, परंतु ज्या धैर्याने, चिकाटीने आणि मानसिक संतुलन राखून सर्वांचा समाधान करणारा निर्णय त्यांनी केला. यामुळे त्यांच्या नेतृत्व गुणांची कसोटी लागलेली आहे. मनोज जरांगे-पाटील मराठा आरक्षणासाठी मुंबईत आले. मराठा समाजाचा त्यांना पाठिंबा आहे. हजारो युवक त्यांच्या मागोमाग आले. आझाद मैदान आणि छत्रपती शिवाजी महाराज स्टेशन येथील परिसर आंदोलकर्त्यांनी व्यापून गेला. आरक्षण मिळाल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नाही, अशी जरांगे-पाटील यांनी ठाम भूमिका घेतली. त्यांच्या आंदोलनाने अनेक प्रश्न निर्माण केले. त्यातील काही प्रश्न राजकीय आहेत. मनोज जरांगे-पाटील यांच्या मागे कोण आहे? आंदोलन पैशाशिवाय उभे राहू शकत नाही, ही रसद पुरविणारे कोण? त्यांचे राजकीय हेतू कोणते? मनोज जरांगे-पाटील यांना पुढे करून त्यांच्या खांद्यावर बंदुका कोणी रोखल्या आहेत? लक्ष्य कोण आहे? या प्रश्नांची भरपूर चर्चा झाली. काही चर्चा जाहीरपणे झाली, काही दबक्या आवाजात झाली. देवेंद्र फडणवीस हे लक्ष्य आहेत, हे न सांगताच सर्वांना समजले. त्यांच्या विरुद्ध अर्वाच्च भाषा वापरली गेली. जातीमुक्तीवाल्यांनी त्यांची जात काढली. सकाळ-संध्याकाळ महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जप करणाऱ्यांनी फडणवीसांच्या जातीचा तेवढाच जप सुरू केला. बहुसंख्य आमदार मराठा आहेत, तर ब्राह्मण मुख्यमंत्री कसा? हा महाराष्ट्राचा 'पुरोगामी विचार' या लोकांनी मांडला. देवेंद्र फडणवीस यांच्या संयमाच्या कसोटीचा हा कालखंड आहे.

मुख्यमंत्री म्हणून त्यांच्यावर तिहेरी जबाबदारी आहे. पहिली जबाबदारी राज्यात शांतता आणि सुव्यवस्था याची परिस्थिती कायम ठेवण्याची, दुसरी जबाबदारी आरक्षण मागणाऱ्या मराठा समाजाला न्याय देण्याची आणि त्याच वेळी त्यांना न्याय देताना ओबीसी समाजगटावर अन्याय होणार नाही हे पाहण्याची; आणि तिसरी जबाबदारी देवेंद्र फडणवीस एका विचारधारेचे मुख्यमंत्री आहेत. या विचारधारेविषयी जेवढा अपप्रचार करता येईल तेवढा पुरोगामी मंडळींनी केलेला आहे. या विचारधारेचा एक चेहरा म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी न्याय द्यायचा होता.

चाणक्याने आदर्श राजकर्त्याची गुणवत्ता सांगितली आहे, त्यात पहिला गुण असा सांगितला की, राज्यकर्ता सदैव प्रजेचे हित करणाराच असायला पाहिजे. स्वतःच्या हिताचा विचार न करता प्रजेच्या हिताला त्याने अग्रक्रम दिला पाहिजे. देवेंद्र फडणवीस यांनी मराठा आरक्षणाच्या विषयावर न्यायाची भूमिका घेताना कुणावरही अन्याय होणार नाही असा निर्णय केला.

अशा नेत्याच्या गुणसंपदेविषयी गीतेच्या १२ व्या अध्यायात श्लोक १३ ते १९ यात भगवान श्रीकृष्णाने फार सुंदर विवरण केलेले आहे. विनोबा भावेंच्या 'गीताई'त त्याचा फार अप्रतिम अनुवाद आहे. त्यातील काही शब्द असे आहेत,

'कोणाचा न करी द्वेष दया मैत्री वसे मनी..  
सदा संतुष्ट संयमी दृढ निश्चयी..  
जो न लोकांस कंटाळे ज्यास कंटाळती न ते (लोक)..  
न उल्हासे, न संतापे, न मागे, न झुरे..  
सम देखे सखे, वैरी तसे मानापमानही..  
निंदा स्तुती न घे मौनी मिळे ते गोड मानी स्थिर बुद्धी..'

यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या सर्व काळात अतिशय शांतचित्त राहिले, स्थिर बुद्धी राहिले. आपल्याला काय करायचे आहे आणि कसे करायचे आहे, याविषयी त्यांची भूमिका स्पष्ट राहिली आणि योग्य वेळी योग्य निर्णय ते घेऊ शकले.

राजकारणाचा विचार करता राजकीय प्रश्न कधी संपत नाहीत. एक प्रश्न संपल्यासारखा वाटतो, पण त्या प्रश्नात भविष्यातील प्रश्नांची बीजे असतात. पहिल्या श्रेणीच्या राजनेत्याला प्रश्न टाळता येत नाहीत, प्रश्नसंन्यास घेता येत नाहीत, हे प्रश्न अफजल खानासारखे असतात-त्यांच्या भेटीला जावे लागते. पुढे काय करायचे ते सांगण्याची काही गरज नाही.

### शिक्षकी पेशा; नोकरी नव्हे, एक व्रत

शिक्षकी पेशा म्हणजे केवळ एक नोकरी नसून ते एक व्रत आहे जे प्रत्येक शिक्षकाने संपूर्ण श्रद्धेने आणि जबाबदारीने स्वीकारलेले असते. 'कि घेतले न हे व्रत आम्ही अंधतेने' या ओळीतून शिक्षकाच्या समाजाप्रति जबाबदारीची व समर्पणाची भावना व्यक्त होते. हा पेशा स्वीकारण्यासाठी एका शिक्षकाने डॉक्टर, इंजिनीअर, वकील यांच्याप्रमाणे स्वतंत्र व विशेष असे शिक्षण व प्रशिक्षण घेतलेले असते. त्यानंतरच प्रत्येक शिक्षक स्वतःला ज्ञानाचा दीप म्हणून विद्यार्थ्यांपुढे उभा करतो आणि नंतर हा दीप स्वतः आयुष्यभर जळून इतरांना प्रकाश देतो व मार्ग दाखवतो. कुंभाराप्रमाणे शिक्षक ओल्या मातीच्या गोळ्याप्रमाणे असलेल्या लहान अबोध बालकांना घडवून सुबक आकार देऊन त्यांचे भविष्य घडविण्याचा प्रयत्न करतो. शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाची आवड निर्माण करतो आणि त्यांना भविष्यासाठी तयार करतो. एक चांगला शिक्षक विद्यार्थ्यांना स्वतःच्या क्षमतांवर विश्वास ठेवायला शिकवतो. हीच खरी शिक्षकाच्या आयुष्याची व्याख्या आहे. भारतात दरवर्षी ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन साजरा केला जातो. या दिवशी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांच्या जयंतीनिमित्त शिक्षकांचे योगदान आणि त्यांचा सन्मान केला जातो. शिक्षकांच्या समर्पणाबद्दल विद्यार्थ्यांमध्ये कृतज्ञता निर्माण व्हावी, त्यांचे योगदान लक्षात राहावे म्हणून हा खास दिवस असतो. शिक्षक केवळ अभ्यासक्रम शिकवत नाहीत, तर ते विद्यार्थी घडवतात. संस्कारांची मशाल त्यांच्या हातात असते. विद्यार्थ्यांमध्ये विचारशक्ती, नैतिकता, शिस्त आणि मूल्यांची जडणघडण करण्याचे अवघड पण महत्त्वाचे काम शिक्षक करतो. डिजिटल युगात विद्यार्थ्यांना नानाविध माहिती सहज मिळते, पण योग्य विचार करायला शिकवणे हे काम एक शिक्षकच करू शकतो. शिक्षकी पेशात शिक्षकांनी जे व्रत घेतले आहे ते अंधतेने नव्हे, तर दृढ विश्वासाने, सेवाभावाने, कर्तव्यभावनेने आणि विवेकाने घेतलेले असते. यात विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भवितव्य घडविण्याच्या ठाम निर्धार असतो. देशाच्या भावी नागरिकांना ज्ञानाचा, संस्कारांचा आणि प्रेरणेचा प्रकाश देण्याचे हे व्रत आहे. शिक्षकाला माहीत असते की त्याच्या एका शब्दाचा, एका कृतीचा परिणाम एका पिढीवर होऊ शकतो. म्हणूनच हे व्रत म्हणजे जबाबदारीची जाणीव व सजगतेने स्वीकारलेली प्रतिज्ञा आहे. यासाठी शिक्षकाचे जीवन महान ठरते.

**सुमेघ रामचंद्र वानरे**/९१३००२१३८७

## वाचक पत्रे

### पावसाळा आणि घ्यावयाची काळजी

राज्यात येत्या शनिवारपर्यंत कोकणासह मध्य महाराष्ट्र व विदर्भात वादळी वारे, विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पाऊस पडणार आहे, असा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. पावसाळ्यात डेंग्यू, मलेरियाचा धोका वाढतो. यासाठी पाणी साचू न देणे, अस्वच्छता बाळगणे यासारख्या गोष्टी घातक ठरते. अस्वच्छतेमुळे अन्नातून विषबाधा संभवते. त्यामुळे ताजे अन्न खावे, पाणी उकळून प्यावे. लहान मुले, वृद्धांची विशेष काळजी घ्यावी आणि रोगप्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी उपाय करावे. पावसाळा सुरू झाला की डासांची संख्या वाढते. त्यामुळे डेंग्यू, मलेरिया आणि चिकनगुनियासारख्या आजारांचा धोका वाढतो. पाणी साचल्यामुळे डास आणखी वाढतात तसेच तापमानात चढ-उतार होतो. हवेतील आर्द्रता वाढते. त्यामुळे व्हायरस आणि बॅक्टेरिया वाढतात. परिणामी व्हायरल इन्फेक्शन, ताप, सर्दी-खोकला असे त्रास सुरू होतात. त्यामुळे पावसात भिजणं टाळावं. जेणेकरून आरोग्य बिघडणार नाही. आरोग्याशी निगडित कोणताही त्रास जाणवल्यास तातडीने डॉक्टरांना भेटावे. या ऋतूमध्ये सांधेदुखी आणि सूज वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे व्यायाम करावे. गरम पाण्याचा शेक घ्यावा. रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी हळद टाकलेलं दूध, तुळस आणि आल्याचा चहा प्यावा. पावसाळ्यात आहाराची काळजी घेणे आवश्यक आहे. भाज्यांचे सेवन काळजीपूर्वक करावे. लसूण आणि कांदा यासारख्या भाज्यांचे सेवन कमी केले पाहिजे. पावसाळ्यात ओलावा आणि मातीमुळे वांग्यांमध्ये लवकर किड लागते, ज्यामुळे विषबाधा किंवा पोटाच्या समस्या उद्‌भवू शकतात.

**सुनील शिरपुरे**/७०५७१८५४७९

### समाज-राष्ट्राचा खरा शिल्पकार

भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिन ५ सप्टेंबर हा दिवस भारतात शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या दिवशी देशातील शाळा, महाविद्यालयातील शिक्षकांचा सत्कार करुन त्यांना सन्मानित करण्यात येते तसेच तालुका, जिल्हा व राष्ट्रीय स्तरावर देशातील आदर्श शिक्षकांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. भारतीय परंपरेने शिक्षिकाला समाजात मानाचे स्थान दिलेले आहे. मातृ देवो भव, पितृ देवो भव, त्याच प्रमाणे आचार्य देवो भव अशी आपली संस्कृती आहे. अशा आचार्याविषयी आदर भावना व्यक्त करून त्यांचा गौरव करणे हा शिक्षक दिनाचा विशेष आहे. भारतात प्राचीन काळापासून गुरुची किंवा शिक्षकाची भूमिका अतिशय महत्त्वपूर्ण अशी राहिलेली आहे. 'बोले तैसा चाले, त्यांची वंदावी पाऊले' अशी गुरूची महती आहे. शिक्षक हा समग्र परिवर्तनाचा अग्रदूत आहे. तो समाज व राष्ट्राच्या जडणघडणीतील एक अत्यंत महत्त्वाचा घटक असल्यामुळे त्याला 'सामाजिक अभियंता' असे म्हटले जाते. शिक्षक म्हणजे उद्याची पिढी घडविणारा समाजाचा आधारस्तंभ. शिक्षकाचे अध्यापन एक साधना असते. शिस्त, क्षमता व कर्तव्य यांचा संगम म्हाजे शिक्षक होय. शिक्षकाचे समाज व राष्ट्रनिर्माणातील स्थान अढळ आहे.समाज व राष्ट्र घडविण्यासाठी कटिबद्ध असलेल्या गुरुजनांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा !

**के. आर. बनसरे**/सेवानिवृत्त मुख्याध्यापक

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# गणपती उत्सवाप्रमाणे आपले जीवनही आनंदी आणि उत्साही असावं– पोलिस अधीक्षक नवनित कॉवत

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ सप्टेंबर**

जिवनात शिस्त आणि सकारात्मक दृष्टिकोन जोपासणे महत्वाचे आहे, गणपती उत्सवाप्रमाणे आपले जीवनही आनंदी आणि उत्साही असावं. ताणतणावात जगण्याऐवजी तणावमुक्त जीवन जगणं हीच खरी प्रगती आहे. असे प्रतिपादन बीड जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक नवनित कॉवत यांनी केले. ते आदित्य शिक्षण संस्थेमध्ये श्रींच्या आरती प्रसंगी विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधताना बोलत होते. यावेळी संस्थेच्या वतीने संचालक डॉ.आदित्य सारडा,आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा, सी. ए. गिरीशजी गिल्डा यांनी एसपी नवनित कॉवत यांचा सत्कार केला.



आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या गणेशोत्सवाचे औचित्य साधून मंगळवारी पोलिस अधीक्षक नवनित कॉवत यांच्या हस्ते श्रींच्या आरतीचा भव्य कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

यावेळी आदित्य डेंटल कॉलेज चे प्राचार्य डॉ.हिमांशू , आदित्य आयुर्वेद चे प्राचार्य डॉ. विवेक कुलकर्णी, आदित्य कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा, आदित्य कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सतीश कचरे, आदित्य कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल सानप, आदित्य नर्सिंग महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विकास गर्जे, आदित्य फिजिओथेरपी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.बालाजी बहिरवाल यांच्यासह सर्व महाविद्यालयाचे प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी पोलिस अधीक्षक नवनित कॉवत यांनी विद्यार्थ्यांसोबत मनमोकळा संवाद साधला. विद्यार्थ्यांना मार्गदर्शनही केले. त्यांनी जीवनात एकोपा, शिस्त आणि सकारात्मक दृष्टिकोन जोपासण्याचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. त्यांनी सांगितले की, गणपती उत्सवाप्रमाणे आपले जीवनही आनंदी आणि उत्साही असावं. ताणतणावात जगण्याऐवजी तणावमुक्त जीवन जगणं हीच खरी प्रगती आहे. प्रसंगी विद्यार्थ्यांनी पोलीस अधीक्षकांना यांच्याशी मनमोकळा संवाद साधत त्यांना विविध सामाजिक उपक्रमांबद्दल माहिती विचारली. महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी पोलीस प्रशासनाबाबतची रांगोळी काढून मान्यवरांचे स्वागत केलं. पोलिस अधीक्षक यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साह आणि आत्मविश्वास निर्माण झाला.

माणूस उभा आहे वर्दीतला, म्हणून सण साजरा होतोय गर्दीतला

आदित्य शिक्षण संस्थेच्या वतीने पोलिसांची कार्यतत्परता आणि कर्तव्य कठोरता दाखवणार रांगोळी काढण्यात आली होती. या रांगोळीतून माणूस उभा आहे वर्दीतला, म्हणून सण साजरा होतोय गर्दीतला हा महत्वपूर्ण संदेश देण्यात आला होता.

## जिल्हास्तरीय लोकशाही दिनात तीन अर्ज प्राप्त

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ सप्टेंबर**

जिल्हास्तरीय लोकशाही दिनामध्ये ०३ तक्रार अर्ज प्राप्त झाले. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहात लोकशाही दिन संपन्न झाला.यावेळी उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) शैलेस सुर्यवंशी, तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी, जिल्हा पोलीस मुख्यालय, जिल्हा परिषद, पाटबंधारे विभाग सार्वजनिक बांधकाम विभाग, परिवहन विभाग, सहकार विभाग, कृषी विभाग व पाणी पुरवठा विभाग, समन्वय अधिकारी इत्यादी जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी व ज्या कार्यालयाकडून लोकशाही दिनातील प्रलंबित प्रकरणे होती, ते संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## अविष्कार स्पर्धेविषयी मार्गदर्शन करण्यासाठी स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयातर्फे ऑनलाईन मीटिंगचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ सप्टेंबर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर विद्यार्थी विकास मंडळातर्फे आयोजित अविष्कार २०२५ ही जिल्हास्तरीय स्पर्धा १८ सप्टेंबर २०२५ रोजी स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालय, बीड येथे होणार आहे. या स्पर्धे विषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यासाठी आज दिनांक ४ सप्टेंबर २०२५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालय, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने ऑनलाईन इंडक्शन मीटचे आयोजन करण्यात आले.या मीटिंगमध्ये मार्गदर्शन करताना विद्यापीठाचे अविष्कार समन्वयक प्रा. भास्कर साठे यांनी बीड जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांनी आपल्या विद्यार्थ्यांना या स्पर्धेत जास्तीत जास्त संख्येने सहभागी करून घ्यावे असे आवाहन केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची संशोधन वृत्ती विकसित व शोधून काढणे हाच या स्पर्धेचा मुख्य उद्देश असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या महाविद्यालयांना विशेष गुण विद्यापीठातर्फे प्रदान केले जाणार असून न सहभागी होणाऱ्या महाविद्यालयांवर दंडात्मक कारवाई होऊ शकते, असेही त्यांनी सांगितले.या मीटिंगचे प्रास्ताविक विद्यापीठातर्फे नियुक्त अविष्कार बीड जिल्हा समन्वयक प्रा. पुरुषोत्तम देशमुख यांनी केले. यावेळी विद्यापीठाचे बीड जिल्हा समन्वयक प्रा. सादिक बागवान हेही उपस्थित होते. तसेच अविष्कार बीड जिल्हा समन्वयक (के. एस. के. महाविद्यालय) यांनीही मार्गदर्शन केले. या मीट मध्ये ८० विविध महाविद्यालयातील समन्वयक सहभागी झाले होते.समारोपाच्या वेळी स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे यांनी बीड जिल्ह्यातील सर्व (१२०) महाविद्यालयांना या स्पर्धेत सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अविष्कार बीड जिल्हा समन्वयक डॉ. स्वाती कुलकर्णी (स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालय) यांनी केले. तर सह-समन्वयक डॉ. विशाल नाईकनवरे यांनी आभार प्रदर्शन केले.

## श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे रविवार रोजी अनिल म.कासकर यांचे कीर्तन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ सप्टेंबर**




विसाव्या शतकातील महान संत .किसनबाबा यांच्या २८ व्या वर्षातील पहिली पुण्यतिथी भाद्रपद शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प. अनिल महाराज कासकर मौजवाडी ता.जि.बीड यांचे रविवार दिनांक ७ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे अवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व समस्त गावकरी मौजवाडी यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.

## सौ. के.एस.के. (काकू) बी.टेक. फूड टेक्नॉलॉजी आणि बी.एस्सी. ॲग्री अभ्यासक्रमाचे संस्थास्तरीय व्यवस्थापन कोटयातून प्रवेशासाठी त्वरित संपर्क करावा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ सप्टेंबर**

१२ वी सायन्स उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी अन्नतंत्र व कृषि शिक्षणाची प्रवेश प्रक्रिया संस्थास्तरीय व्यवस्थापन कोटयातून प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी त्वरित संपर्क करावा, ज्या विद्यार्थ्यांना अन्नतंत्र बी.टेक.फूड टेक्नॉलॉजी व कृषि बी.एस्सी ऑनर्स ॲग्री, शिक्षणासाठी थेट प्रवेश घ्यावयाचा आहे, अशा विद्यार्थ्यांनी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ संलग्न असलेल्या अ दर्जा प्राप्त सौ. के. एस. के. (काकू) अन्नतंत्र व कृषि महाविद्यालय, म्हसोबा फाटा, नगर रोड, बीड या ठिकाणी ऑनलाईन प्रवेश फॉर्म भरुन प्रवेशासाठी संपर्क साधावा, व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी ज्या विद्यार्थ्यांनी सीईटी चक्ढ-उएढ) परिक्षा तसेच अभ्यासक्रमाशी संबंधित राष्ट्रीय प्रवेश परिक्षा जे.ई.ई. आणि एनईईटी गएए छएएढ) दिलेल्या आहेत, अशा सर्व विद्यार्थ्यांनी सौ.के.एस. के.( काकू) अन्नतंत्र व कृषि महाविद्यालय म्हसोबा फाटा, नगर रोड, बीड येथे त्वरित संपर्क करून आपन्ना प्रवेश निश्चित करावा.नरी विद्यार्थ्यांनी वा संधीचा लाभ घेवून प्रवेशासाठी त्वरित संपर्क साधावा आणि प्रवेश घ्यावा, असे महाविद्यालयातर्फ आवाहन करण्यात येत आहे. संपर्कासाठी फोन नं.: ९४२००२५०५२ / ९७६३४३४५०४/ ९७०८४२०१४/९९७५०२५९७७/७५८८०८२०३४

# ना.पंकजा मुंडेंनी घेतले मानाच्या गणेशांचे दर्शन





**शठिक ठिकाणी केली आरती ; गणेश मंडळाच्या वतीने झाले जंगी स्वागत**

**तभा वृत्तसेवा**
**पुणे दि.५ सप्टेंबर**

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज शहरातील मानाच्या पांच गणपतीसह विविध गणेशांचे दर्शन घेतले. ठिक ठिकाणी त्यांच्या हस्ते श्रींची आरती करण्यात आली. गणेश मंडळाच्या वतीने यावेळी त्यांचं जंगी स्वागत करण्यात आलं.

पुण्यातील गणेशोत्सव केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर जगभरात लोकप्रिय आहे. गणेशाच्या भव्य दिव्य मुर्तींचे तसेच देखाव्यांचे याठिकाणी आकर्षण असते. दरवर्षीच्या प्रथेप्रमाणे ना. पंकजाताई मुंडे यांनी आजच्या पुणे दौ-यात सायंकाळी मानाच्या पांच गणपतीपैकी पहिल्या कसबा पेठेतील गणपतीचे दर्शन घेऊन आरती केली. त्यानंतर तांबडी जोगेश्वरी, केसरीवाडा, गुरूजी तालीम मंडळ, तुळशीबाग, दगडूसेठ हलवाई, साने गुरूजी तरूण मंडळ आदी गणेश मंडळांना भेटी देवून श्रींची आरती केली. आ. माधुरीताई मिसाळ, सदाशिव खाडे, धिरज घाटे, अशोक मुंडे व कार्यकर्ते यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शहरात आगमन होताच ना. पंकजाताई मुंडे यांचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी ठिक ठिकाणी जोरदार स्वागत केले.

# गणपती उत्सवानिमित्त दीनदयाल शोध संस्थांमध्ये स्पर्धांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ सप्टेंबर**

दीनदयाल शोध संस्थान संचलित, नानाजी देशमुख विद्या मंदिर ,गोकुळ शिशु वाटिका बीड येथे गणपती उत्सवानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. २८ ऑगस्ट रोजी गणपती स्तोत्र म्हणणे स्पर्धा घेण्यात आली होती. परीक्षक म्हणून जन शिक्षण संस्थांनच्या लेखापाल सौ. केवडकर ताई काम केले .२९ ऑगस्ट रोजी दुर्वाची जुडी तयार करणे त्यासाठी परीक्षक सौ. स्वातीताई जैन, ३० ऑगस्ट गणपती ची नावे स्पर्धा घेण्यात आली होती त्या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून जन शिक्षण संस्थानच्या कार्यक्रम अधिकारी सौ.सीमाताई मनुरकर , यानंतर रंगभरण स्पर्धा घेण्यात जन शिक्षण संस्थांनच्या कॉम्प्युटर ऑपरेटर सौ .सुमेधाताई मनसबदार यांनी परीक्षक म्हणून काम केले.



स्वच्छंद गटासाठी जिलेबी खाणे त्यासाठी परीक्षक म्हणून जन शिक्षण संस्थांन चे सहायक कार्यक्रम अधिकारी सुदाम पालकर सर लाभले होते. सर्व स्पर्धांसाठी मा.सुनंदाताई कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.स्पर्धेमध्ये स्वच्छंद , ध्रुव, प्रल्हाद गट, पहिली व दुसरी च्या वर्गातील सर्व विद्यार्थी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. सर्व स्पर्धा यशस्वी करण्यासाठी नानाजी देशमुख विद्या मंदिर मुख्याध्यापिका,गोकुळ शिशु वाटिकाप्रमुख , सर्व शिक्षक वृंद व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.गणपती आरतीचा मान वेद घोडके, सावी गव्हाणे, मल्हार, वेदश्री, योगेश्वरी डाके, प्रांजल यादव, अंजली मोहोळकर, साची व शिवांश पवार, वैभवी धापसे, जान्हवी व राजनंदिनी तांबारे , देव क्षीरसागर, वैभव वखरे, मृणाल पवार, श्रुती कुडके यांच्या पालकांना देण्यात आला. भारतरत्न नानाजी देशमुख यांच्या विचारानुसार समाजाच्या सहभागातून विद्यार्थ्यांना प्रसाद व खाऊ वाटप करण्यात आला.

**महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या** वतीने कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकारचे **जन शिक्षण संस्थान बीडचे संचालक श्री गंगाधर जी देशमुख यांना कौशल्य दीप पुरस्कार जाहीर**

..............................................

कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार व दीनदयाल शोध संस्थान संचलित जन शिक्षण संस्थान बीड द्वारा जिल्ह्यात 15 ते 45 वयोगटातील निरक्षर ,नव साक्षर, रूडीमेंट्री व कमी शिकलेल्या महिला व पुरुषांना टेलरिंग, पार्लर ,इलेक्ट्रिकल टेक्निशियन, टू व्हीलर रिपेरिंग, मोबाईल दुरुस्ती, ज्यूट बॅग मेकिंग, हॅन्ड एम्ब्रोईडरी, सोलार पी व्ही इन्स्टॉलेशन, कम्प्युटर ऑपरेटर इत्यादी प्रकारचे प्रशिक्षण अतिशय अल्प फीस मध्ये तर काही प्रवर्गातील लोकांना निशुल्क स्वरूपात प्रशिक्षण तुमच्या दारी या ब्रीद वाक्यानुसार



जिल्ह्यात शहरी भागासह वाडी, वस्ती, तांडे ,आदिवासी वस्त्यांवर प्रशिक्षण देण्याचे कार्य 2004 सालापासून सुरू असून प्रशिक्षण घेतलेल्या लाभार्थ्यांच्या स्वावलंबनासाठी जिल्हा उद्योग केंद्र, विविध बँका व बचत गटाच्या सहकार्याने अर्थसहाय्य मिळवून देण्यासाठी जन शिक्षण संस्थान बीड चे संचालक श्री गंगाधर जी देशमुख सतत प्रयत्नशील आहेत.
आत्तापर्यंत 44800 लोकांनी विविध प्रकारचे प्रशिक्षण घेऊन अनेकांनी स्वतःचे उद्योग व्यवसाय सुरू केले आहेत.
जन शिक्षण संस्थानच्या या कार्याची अनेक सामाजिक संस्थांनी दखल घेऊन विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.
अशाच प्रकारे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने श्रीमान गंगाधर जी देशमुख सरांना शिक्षक दिनाच्या निमित्ताने कौशल्य दीप पुरस्कार घोषित केल्याबद्दल जन शिक्षण संस्थान

आभार व्यक्त करत आहे. स्टाफ द्वारा शांत,संयमी,कुशल संघटक,व आमचे मार्गदर्शक श्रीमान गंगाधर जी देशमुख सरांचे खूप खूप अभिनंदन व शुभेच्छा.

# रांगोळीतून व्यक्त केली गुरू प्रति कृतज्ञता, ८ विद्यार्थी बनले शिक्षण, विद्यार्थ्यांना दिले धडे






**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ सप्टेंबर**

शहरातील आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य डेंटल कॉलेज मध्ये ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन मोठ्या उत्साहात आणि कृतज्ञतेच्या भावनेने साजरा करण्यात आला. महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी गुरू शिष्यांचे नाते सांगणारी रांगोळी काढून गुरू प्रति आपली कृतज्ञता व्यक्त केली. ऋषिकेश रासकर,हर्षली राठोड,उज्वला मुंढे,सारिका कापसे,प्रथमेश भोईर,निकिता जंगीद,ज्ञानेश जुत्ते,आकांक्षा मुलगीर,साहिल पोइंकार या विद्यार्थ्यांनी शिक्षण होऊन विद्यार्थांना ज्ञानदानाचे कार्य केले. माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांना अभिवादन करण्यात आले.

आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा,संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या शिक्षक दिन कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी शिक्षकांविषयी असलेली निस्सीम आदर भावना विविध कार्यक्रमाद्वारे व्यक्त केली. मार्गदर्शन, संस्कार व मूल्यांचे बीज विद्यार्थ्यांच्या मनात पेरणाऱ्या आपल्या गुरुजनांबद्दल विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केली. शिक्षकांच्या योगदानामुळेच विद्यार्थी जीवनातील अंधार दूर होतो व ज्ञानाचा दीप उजळतो, हे सत्य सर्वांनी अधोरेखित केले. या प्रसंगी उपस्थित प्राध्यापकांनीही शिक्षक या संकल्पनेचा गाभा उलगडून सांगितला. शिक्षक हा केवळ विषय शिकवणारा नसून तो विद्यार्थ्यांच्या जीवनाचा मार्गदर्शक दीपस्तंभ आहे. गुरुशिवाय जीवनात खरी प्रगती शक्य नाही, असे प्रतिपादन संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी केले शिक्षक दिन हा केवळ एक उत्सव नसून शिक्षकांच्या अमूल्य योगदानाचे स्मरण करण्याचा दिवस आहे, याची प्रचीती या कार्यक्रमातून पुन्हा एकदा आली. कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी केले होते.यावेळी आदित्य डेंटल कॉलेज चे प्राचार्य डॉ.हिमांशू श्रीवास्तव , आदित्य आयुर्वेद चे प्राचार्य डॉ. विवेक कुलकर्णी, आदित्य कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा, आदित्य कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सतीश कचरे, आदित्य कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल सानप सानप, आदित्य नर्सिंग महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विकास गर्जे, आदित्य फिजिओथेरपी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.बालाजी बहिरवाल व सर्व महाविद्यालयाचे प्राध्यापक आणि शिक्षकोत्तर कर्मचारी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# विघ्नहर्ता श्री चिंतामणीच्या दर्शनासाठी २ लाख भाविक येण्याचा अंदाज

## मंदिर संस्थान समिती, पोलिस प्रशासन, जिल्हा प्रशासन सज्ज

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ सप्टेंबर**



हिंगोली शहरातील मोदकाचा गणपती तसेच नवसाला पावणारा गणपती म्हणून देशभरात प्रसिध्द असलेल्या विघ्नहर्ता श्री चिंतामणी गणपतीच्या दर्शनासाठी सुमारे २ लाख भाविक दर्शनासाठी येणार असल्याचा अंदाज व्यक्त केला जात असून भाविकांच्या सोयीसाठी मंदिर संस्थान समिती, पोलिस प्रशासन तसेच जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे. होणारी गर्दी लक्षात घेता शहरातील वाहतुक मार्गातही बदल करण्यात आले आहेत.

दरवर्षी अनंत चर्तुदशीच्या दिवशी विघ्नहर्ता श्री चिंतामणी गणपतीच्या दर्शनासाठी जिल्ह्यासह राज्यातून तसेच परराज्यातून हजारो भाविक दर्शनासाठी येतात. महाराष्ट्रासह गुजरात, राजस्थान, आंध्र प्रदेश, तेलंगणा, दिल्ली, मध्यप्रदेश या राज्यातून भाविक दर्शनासाठी येत असतात. यावर्षी संस्थानच्यावतीने दररोज मोदक वाटप करण्यात आले आहेत.

शनिवारी दि ६ सप्टेंबर रोजी पहाटे चार वाजता आरती होणार आहे. तसेच गणपतीच्या दर्शनाला लवकरच सुरूवात होणार आहे. यावर्षी सुमारे २ लाख भाविक दर्शनासाठी येणार असल्याचा अंदाज व्यक्त केल्या जात असून भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी तीन ते चार ठिकाणी वॉटरप्रुफ मंडप उभारण्यात आले आहेत. याशिवाय बसण्यासाठी खुर्च्यांची व्यवस्थाही करण्यात आली आहे. दर्शन रांगेतील भाविकांना चहा, पाणी, नाश्ता, भोजनाची व्यवस्थाही करण्यात आली आहे. तसेच विविध मंडळाच्यावतीने, दानशूर व्यक्ती यांनी ही व्यवस्था केली आहे. रात्री उशिरापर्यंत दर्शन सुरू राहण्याचा अंदाज व्यक्त केल्या जात आहे.

पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना यांनी दर्शन मार्गाची पाहणी करून सुमारे ४०० पेक्षा अधिक पोलिस कर्मचारी व गृहरक्षक दलाचे जवान बंदोबस्तासाठी तैनात केले आहेत. शिवाय १०० पेक्षा अधिक स्वयंसेवक मदतीला राहणार आहेत. तसेच ठिकठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे देखील बसविण्यात आले आहेत.

दर्शन रांग व परिसरात स्वच्छता राखण्यासाठी पालिका मुख्याधिकारी अरविंद मुंडे, स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर, उपमुख्याधिकारी शाम माळवटकर, यांनी सफाई कामगारांची चार पथके स्थापन करून त्यांना विविध ठिकाणी स्वच्छतेसाठी नियुक्त केले आहे. गोळा केलेला कचरा वाहून नेण्यासाठी ६ घंटागाड्या ठेवण्यात आल्या आहेत. देशभरातून येणाऱ्या तसेच बाहेर गावाहून येणाऱ्या भाविकांची संख्या लक्षात घेता खाजगी वाहनांसाठी रामलीला मैदानावर पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे शहरात रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही. दर्शन व्यवस्था दरवर्षीप्रमाणेच असणार असून संकटमोचन हनुमान मंदिरापासून रांगेला सुरूवात होईल. त्यानंतर भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक, महावीर चौक, मेडीकल लाईन, जुने ग्रामीण पोलिस ठाणे, मारवाडी गल्ली भागातून दर्शन रांग मंदिरापर्यंत जाणार आहे.

# विघ्नहर्ता गणेश मंडळाच्यावतीने १५०० रोपांचे वाटप



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ सप्टेंबर**

येथील रिसाला नाका श्री विघ्नहर्ता गणेश मंडळाच्यावतीने पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचे आयोजन करण्यात आले. यावेळी दर्शनासाठी येणाऱ्या प्रत्येक गणेश भक्ताला झाडे लावण्यासाठी १५०० रोपांचे वाटप करण्यात आले.

रिसाला नाका येथील श्री विघ्नहर्ता गणेश मंडळाने यंदा गणेशोत्सव अत्यंत वेगळ्या आणि पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा केला आहे. मंडळाच्या या नाविन्यपूर्ण उपक्रमाची दखल घेत हिंगोलीचे आमदार तानाजीराव मुटकुळे यांनी मंडळाला सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांच्यासोबत माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, माजी नगराध्यक्ष दिलीपराव चव्हाण, माजी नगरसेवक अनिल नेनवानी, प्रशांत सोनी, जीतसिंग साहू, राजू गोटे, साखळे सर, बिरजू भैय्या यादव, निनाजी कांडेलकर, संजय ननवरे, शिवा शिंदे, मनीष भगत, सचिन गायकवाड, सचिन राठोड, संजय जाधव, नागेश झळके, राजू जगताप, दर्शन कांडेलकर यांसारखे अनेक प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

या प्रसंगी बोलताना आमदार तानाजीराव मुटकुळे यांनी मंडळाच्या या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. ते म्हणाले, गणेशोत्सवादरम्यान आपण पर्यावरणपूरक मूर्तींचा वापर करण्यावर भर देतो, पण श्री विघ्नहर्ता गणेश मंडळाने तर मूर्ती विसर्जनच न करता ती दुसऱ्या मंडळाला दान करण्याचा निर्णय घेतला आहे. हा एक अत्यंत चांगला आणि इतरांसाठी प्रेरणादायी असा उपक्रम आहे. त्याचबरोबर, प्रत्येक भाविकाला झाड भेट देऊन पर्यावरणाचे रक्षण करण्याचा संदेश दिला जात आहे, हे खरोखरच कौतुकास्पद आहे.

यावेळी मंडळाच्या कार्यकर्त्यांनी उपस्थितांना त्यांच्या उपक्रमाची माहिती दिली. मंडळाने घेतलेला हा निर्णय केवळ पर्यावरणासाठीच नाही तर समाजाला एक चांगला संदेश देण्यासाठीही महत्त्वाचा आहे. अशा उपक्रमांमुळे गणेशोत्सव खऱ्या अर्थाने समाजप्रबोधन करणारा आणि पर्यावरणपूरक बनतो. श्री विघ्नहर्ता गणेश मंडळाचा हा उपक्रम निश्चितच इतरांसाठी एक आदर्श ठरेल.

# हिंगोलीत राष्ट्रीय क्रिडा दिनानिमित्त बॅडमिंटन स्पर्धा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ सप्टेंबर**



जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांची जयंती साजरी करून व राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून हिंगोली येथील जिल्हा क्रीडा संकुलावर पुरुष खुला गट दुहेरी बॅडमिंटन स्पर्धा संपन्न झाल्या.

या स्पर्धेत अनिल शिंदे व नवाज खान या जोडीने प्रथम तर द्वितीय पारितोषिक अंकित राठोर व पियुष साहू या जोडीस मिळाले. तृतीय पारितोषिक संतोष कदम व आसाराम घुगे या जोडीने पटकावले. या पुरुष दुहेरी गटात सोळा संघाने सहभाग नोंदवला होता.

या स्पर्धेमध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांना जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाकडून आकर्षक ट्रॉफीसह पारितोषिक स्वरूपात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे कळमनुरीचे मुख्याधिकारी रविराज दरक, डॉ. श्रीधर कंदी, कृषी अधिकारी पंकज राठोड, दीपक अग्रवाल, अँड. दत्ता देशमुख, सचिन चौधरी, डॉ.योगेश नलवार, अतुल बोरकर उपस्थित होते. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी कार्तिक यादव, रुपेश सोनी, देविकांत देशमुख, विवेक चिलमुल, बब्बू अग्रवाल, डॉ.अजय शिरडकर, नकुल राठोड, रवि पाटील, रामेश्वर अग्रवाल, जितेश धूत, शेख वासिम व अर्जून पवार यांनी परिश्रम घेतले. या स्पर्धेकरिता जिल्हा क्रीडा अधिकारी राजेश्वर मारावार, क्रीडा अधिकारी आत्माराम बोथीकर, क्रीडा अधिकारी प्रवीण कोंडेकर, क्रीडा अधिकारी गणेश बोडखे व क्रीडा मार्गदर्शक निळकंठ श्रावण यांचे मार्गदर्शन लाभले.



**हिंगोली– येथील रिसाला बाजार भागात डॉ प्रा बंकटलाल यादव यांच्या घरी श्री गणेशाच्या समोर दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी सुंदर असा देखावा साकारण्यात आला आहे. दगडी मंदिर तयार करण्यात आले असून परिसरातील भाविकांची पाहण्यासाठी मोठी गर्दी होत आहे.**

## संक्षिप्त वृत्त

### पुसेगाव येथे मोफत आरोग्य शिबीर



हिंगोली– गणेशोत्सव व ईद मिलादुन्नबी या निमित्ताने पुसेगाव येथे मोफत आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभाग नोंदवून सामाजिक बांधिलकी जपली. यावेळी खा. नागेश पाटील आष्टीकर, माजी आ. संतोष टारफे, जिल्हा प्रमुख संदेश देशमुख, तसेच गोपु पाटील, उध्दव गायकवाड, उपजिल्हाप्रमुख परमेश्वर मांडगे, गणेश शिंदे, वसीम देशमुख यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांनी रक्तदात्यांचे कौतुक करून अशा सामाजिक उपक्रमांची गरज असल्याचे सांगितले. शिबिरामध्ये मोफत रक्तदाब, साखर तपासणीसह विविध तपासण्या करण्यात आल्या.

### वसमत येथे शिक्षक दिन साजरा



हिंगोली– व्यसनमुक्ती चळवळीचा प्रचार आणि प्रसार करणाऱ्या नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य, महाराष्ट्र सर्वोदय मंडळ यांच्या संयुक्त विद्यामाने वसमत येथील सुप्रसिद्ध गंगाप्रसादजी अग्रवाल सर्वोदय कार्यालयात दि.५ सप्टेंबर शुक्रवारी शिक्षक दिन पार पडला. शहरातील सुप्रसिद्ध गंगाप्रसादजी अग्रवाल सर्वोदय कार्यालयात शिक्षक दिन पार पडला. यावेळी समर्पित सामाजिक कार्यकर्ते विशाल अग्रवाल यांच्या हस्ते सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी शिक्षक शुभदा सरोदे यांचा सत्कार करण्यात आला. बालाजी दुमाणे, रामराव जाधव, सुभाष कुंभारकर, राधाकिशन हंचाटे यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते, व्यसनमुक्ती चळवळीतील कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. शिक्षक दिनाचे महत्त्व सामाजिक कार्यकर्ते विशाल अग्रवाल, शुभदा सरोदे यांनी विशद केले.

### ३५ वाहन चालकांविरूध्द पोलिसांची कारवाई

हिंगोली– अवैध वाहतुक करणाऱ्या तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ३५ वाहन चालकांविरूध्द पोलिस विभागाच्यावतीने कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून २१ हजार रूपये दंड वसूल करण्यात आला आहे.

# औंढा पोलिस ठाणे परिसरात वृक्षारोपन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ सप्टेंबर**

औंढा नागनाथ येथील पोलीस ठाण्यात पर्यावरण जनजागृतीच्या दृष्टीने पोलिस अधिकारी जी एस राहीरे यांच्यासह कर्मचारी यांचेहस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

यामध्ये करंजी, गुलमोहर, वड, पिंपळ, कडूलिंब, चाफा, सिताफळ, निलगिरी तसेच विविध फुलांची झाडे यांचे वृक्षारोपण करण्यात आले. ५ सप्टेंबर रोजी पोलीस ठाणे परिसरामध्ये १०१ झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी पोलीस निरीक्षक जी एस राहिरे, पोलीस उपनिरीक्षक श्रीधर वाघमारे, पोलीस उपनिरीक्षक गजानन गिरी, पोलीस उपनिरीक्षक दत्ता कानगुले, पोलीस उपनिरीक्षक अफसर पठाण, पोलीस उपनिरीक्षक पंजाब थिटे, जमादार संदीप टाक, रविकांत हरकाळ, वसीम पठाण, गजानन गिरी, सुभाष जयताडे, अमोल चव्हाण, किशोर पारिसकर, वसंत चव्हाण, रमेश मस्के, रावसाहेब देशमुख यांच्यासह पोलीस कर्मचारी व होमगार्ड वृक्षरोपणास उपस्थित होते.

# हैद्राबाद गॅझेट जीआर रद्द करा मागणीसाठी ओबीसींचा येळी फाटा येथे दोन तास रास्ता रोको



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ सप्टेंबर**

औंढा नागनाथ ते जिंतूर, छत्रपतीसंभाजीनगर महामार्गावर औंढा नागनाथ तालुक्यातील येळीफाटा येथे सकल ओबीसी समाजबांधवांच्या वतीने मराठा आरक्षणासाठी लागू केलेल्या हैदराबाद गॅझेट जीआर चा शासनाने निर्णय रद्द करावा, न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या नेतृत्वात गठीत केलेली समिती रद्द करावी, मराठा समाजाला ओबीसी मधून आरक्षण आता व भविष्यात देण्यात येऊ नये या मागणीसाठी शुक्रवार (ता. ५) सप्टेंबरला सकाळी ११ ते दुपारी १ वाजे दरम्यान तब्बल दोन तास रास्ता रोको आंदोलन केले.

सकल ओबीसी बांधवांकडून हैदराबाद गॅझेट जीआरची होळी करण्यात आली .यावेळी सकल ओबीसी समाजबांधव उपस्थित होता.आंदोलनास ओबीसी नेत्यांनी जमलेल्या ओबीसी समाजबांधवांना मार्गदर्शन केले.

या आंदोलनात समता परिषद जिल्हा अध्यक्ष डॉ चंदू लव्हाळे, डॉ नागोराव जांबुतकर, अँड रवी शिंदे, राम नागरे, साहेबराव देवकते, राजू मुसळे, पांडुरंग नागरे, राजेंद्र सांगळे, संजय दराडे, रमेश सानप, उद्धव नागरे, विठ्ठल सांगळे, प्रा गजानन कुटे, विलास काळे, विक्की देशमुख, विलास आघाव, गजानन सांगळे, नंदकिशोर खंदळे, जगन्नाथ सांगळे, जगदीश सांगळे, राजकुमार दराडे, गजानन नागरे, रामप्रसाद आघाव, खंडू दराडे, जयश्री सातव, वनिता गुंजकर, ज्योती दिघाडे, सिंधू जांबुतकर यांच्यासह औंढा तालुक्यातील सकल ओबीसी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होता. रास्ता रोको आंदोलन संपल्यानंतर ओबीसी समाज बांधवांनी प्रशासनास निवेदन दिले. त्यानंतर हैदराबाद गॅझेट जी आर ची होळी करण्यात आली. दोन तासाच्या रस्ता रोको आंदोलनामुळे औंढा-जिंतूर जिंतूर-औंढा रोडच्या दोन्ही साईडला वाहनाच्या दुतर्फा रांगा लागल्या होत्या.या रास्तारोको पोलीस निरीक्षक जी एस राहिरे, पोलीसउपनिरीक्षक दत्ता कानगुले, पोलीस निरीक्षक अफसर पठाण, पोलीस उपनिरीक्षक शेख खुदूस, जमादार संदीप टाक, सुभाष जयताडे, राजकुमार कुटे, गजानन गिरी अमोल चव्हाण, किशोर पारिसकर यांनी कडक बंदोबस्त ठेवला होता.

# नवरात्र उत्सवानिमित्त ठिकठिकाणी बासापूजन





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ सप्टेंबर**

शहरात नवरात्र उत्सवानिमित्त दुर्गा मंडळाकडून जय्यत तयारी करण्यात येत असून ठिकठिकाणी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांकडून बासापूजन करून मंडपाची उभारणी करण्यास सुरूवात झाली आहे.

हिंगोली येथे दसरा महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केल्या जातो. सार्वजनिक मंडळासह इतर दुर्गा मंडळे देखील या उत्साहात सहभागी होतात. यानिमित्त भव्य मंडपाची उभारणी करून दुर्गादेवीची घटस्थापना केली जाते. या पार्श्वभूमीवर येथील आई जगदंबा नवरात्र उत्सव समितीच्या वतीने नवरात्र महोत्सवानिमित्त शुक्रवारी बासापुजन कार्यक्रम दुपारी छत्रपती शिवाजी राजे उद्यान परिसरात होणार आहे. छत्रपती शिवाजी राजे उद्यान परिसर एनटीसी हिंगोली येथे आई जगदंबा नवरात्र उत्सव समितीच्या वतीने दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी नवरात्र महोत्सवानिमित्त मातेच्या प्रागंणात आज शुक्रवार दि.५ सप्टेंबर रोजी दुपारी १ वाजता विधीवत पुजा करुन बासापुजन(ध्वज स्थापना) कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास आई जगदंबा नवरात्र उत्सव समिती व आई जगदंबा गरबा-दांडिया महोत्सव समितीच्या सर्व पदाधिकारी व समिती सदस्या व भाविक भक्तांनी उपस्थित राहावे असे आवाहन आई जगदंबा नवरात्र उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

शहरातील नवदुर्गा मंडळ, टाले हॉल येथील दुर्गा मंडळ, गाडीपूरा येथील दुर्गा मंडळाच्यावतीने जय्यत तयारी करण्यात येत असून टाले हॉल गल्लीतील पदाधिकाऱ्यांनीही बासापूजन केले.

# न्यायमूर्ती सुधाकर गुंडेवार यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ सप्टेंबर**



हिंगोलीचे भूमिपुत्र व उच्च न्यायालयाचे सेवानिवृत न्यायमूर्ती आणि गुंडेवार आयोगाचे प्रमुख सुधाकरराव गुंडेवार यांचे पुणे येथे ४ सप्टेंबरला हृदय विकाराच्या झटक्याने दुःखद निधन झाले. मृत्युसमयी त्याचं वय ८५ वर्ष होते. त्यांच्या पश्चात दोन मुले रुपेश व राहुल, सुना, नातू, एक भाऊ, सात बहिणी आदी मोठा परीवार आहे. त्यांच्या निधनाची वार्ता कळताच त्यांच्या परिवारातील व आप्तेष्टांनी सर्व प्रतिष्ठान बंद करून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. तत्कालीन खासदार कै. विलासराव गुंडेवार यांचे ते चुलत भाऊ होते. हिंगोली येथील आर्यवैश्य समाज, आर्य वैश्य महासभा, आर्य वैश्य युथ, महाराष्ट्र राज्य आर्य वैश्य महासभा, वकील मंडळी, महाराष्ट्र राज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण संघाचे राज्य कार्याध्यक्ष पत्रकार डॉ विजय निलावार आदींनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. पुणे येथे त्यांच्या पार्थिवावर दि ६ सप्टेंबर रोजी अंत्यसंस्कार होणार आहेत.

# यंदाचे विसर्जन निर्विघ्नपणे होणार - आ. अर्जुनराव खोतकर

## राज्यातील पहिल्या कृतीम कुंडात आ. खोतकरांनी गणपती बाप्पाचे केले विसर्जन !

तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनीधी

जालना शहरात यापुर्वी श्रीगणेश विसर्जनाच्या वेळी घडलेल्या दुर्घटनांचा अनुभव लक्षा विसर्जन शिस्तीत, सुलभ आणि प्रदुषणमुक्त व्हावे म्हणुन या विसर्जन कुंडाची निर्मीती करण्यात आलेली आहे. त्याच विसर्जन कुंडाचे आज जालना विधानसभा मतदासंघाचे आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते करण्यात आले आहे. आजघडीला या कुंडाचे काम पुर्ण झाले नसलेतरी अंतीम टप्यात आहे. रविवारी (ता. विसर्जनासाठी हा कुंड तात्पुरत्या स्वरुपात खुला करण्यात येणार आहे. गणपती विसर्जनासह दुर्गादेवी मुर्ती





विसर्जन आणि छटपुजा असे कार्यक्रम येणाऱ्या काळात या ठिकाणी होणार आहेत. जालन्यात जलकुंड निर्मितीचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. तब्बल १९ कोटी रुपये खर्चुन जालना शहरातील मोतीबाग येथे हा जलकुंड उभारला जात आहे. यापूर्वी जालना शहरातील गणेश मूर्तीचे विसर्जन मोती तलावात केले जायचे. मात्र, त्या वेळी तलावात बुडून काही गणेश भक्तांचा मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या होत्या. या दुर्घटनांना प्रतिबंध घालण्यासाठी जालना शहरात यंदा विसर्जन जलकुंड उभारण्यात आला आहे. ३०० २०० फूट क्षेत्रफळ असलेला हा जलकुंड २० फूट खोल असून त्यात साडेचार ते पाच कोटी लिटर पाणी साठवण्याची क्षमता आहे. त्यामुळे यंदाचे गणेश विसर्जन याच विसर्जन जलकुंडात करण्यात येणार आहे. सध्या विसर्जन जलकुंड उभारणीचे काम अंतिम टप्प्यात असून त्यात पाणी सोडण्याचे कामही पूर्ण झाले आहे. यामुळे यंदाचे विसर्जन निर्विघ्नपणे होणार असून कोणतीही दुर्घटना टळणार आहे. असे आ अर्जुनराव खोतकर म्हणाले. विसर्जन कुंडाच्या उद्घाटन सोहळ्याला गणेश भक्तांसह गणेश महासंघाच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते .

## संक्षिप्त

### गणपती विसर्जन स्थळ व मिरवणूक मार्गाची प्रशासनाकडून पाहणी

तभा वृत्तसेवा
मंठा प्रतिनिधी

गणेशोत्सवातील एक भाग म्हणून विसर्जन स्थळाची व मार्गाची प्रशासनातील या संयुक्त पथकातील अधिकाऱ्यांनी पाहणी करून संबंधित विभागास सूचनाही केल्या. यावेळी तहसीलदार कल्याण काळदाते, पोलीस निरीक्षक मनोजकुमार राठोड, बाजार समिती संचालक व नगराध्यक्ष वैजनाथ बोराडे, मुख्याधिकारी मनोज उर्कीडे, आरोग्य अधिकारी, फौजदार संतोष माळगे, विठ्ठल केंद्रे, महावितरणचे अभियंता व आरोग्य विभागातील अधिकारी उपस्थित होते. यावेळी सभापती बाज पठाण, नगरसेवक सचिन बोराडे, विकास सुर्यवंशी, उबेद बागवान, दिपक बोराडे, एन. डी. दवणे, मुस्तफा पठाण, पोलीस कॉन्स्टेबल आनंद ढवळे, मागीलाल, संतोष बनकर गणेश मंडळाचे अध्यक्ष व मंडळातील पदाधिकारी विजय बोराडे, विकास ठोकरे, वैभव मराठे, दत्ता घुगे, माऊली मिसाळ, वेदांत कुलकर्णी, सुमीत बोराडे, राहुल खरात यांच्यासह आदींची उपस्थिती होती. विसर्जन विहिरीतील गाळ काढून घेण्यात आला आहे. परिसर व मार्गदेखील स्वच्छ करण्यात आला असून स्वच्छतेसह विसर्जन स्थळी संध्याकाळी गैरसोय होऊ नये म्हणून प्रकाशासाठी लाईटची व्यवस्था त्याचबरोबर परिसरातील विसर्जन मार्ग मोकळा करून घेण्यात आला आहे. बाजार समिती संचालक व नगराध्यक्ष वैजनाथ बोराडे.

### अंबड घनसावंगी तालुक्यातील पोलिस पाटील आरक्षण सोडत पार पडली



तभा वृत्तसेवा
अंबड प्रतिनिधी

अंबड तहसील कार्यालयातील सभागृहात अंबड व घनसावंगी तालुक्यातील पोलिस पाटील भरतीसाठी आरक्षण सोडत उत्साहात पार पडली. या सोडतीसाठी मोठ्या संख्येने गावकरी व इच्छुक उमेदवार उपस्थित होते. ही सोडत अंबडचे उपविभागीय अधिकारी उमाप पारधी व तहसीलदार विजय चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. सोडतीची संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यात आली. अंबड व घनसावंगी या दोन्ही तालुक्यातील एकूण १८३ रिक्त गावांमध्ये पोलिस पाटील पद भरतीसाठी सोडत काढण्यात आली. यामध्ये आरक्षणानुसार महिलांसह इतर मागासवर्गीय, अनुसूचित जाती–जमाती व इतर घटकांसाठी पदे राखीव ठेवण्यात आली आहेत. सोडतीदरम्यान उमेदवारांच्या उत्सुकतेमुळे सभागृहात उत्साहाचे वातावरण होते. यावेळी तालुक्यातील विविध विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या सोडतीनंतर निवड झालेल्या उमेदवारांची यादी तहसील कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर तसेच संबंधित गावांमध्ये प्रसिद्ध करण्यात येणार असल्याची माहिती तहसील प्रशासनाने दिली. पोलिस पाटील हा गावाच्या सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचा दुवा मानला जातो. त्यामुळे या भरतीकडे सर्वांचे लक्ष लागून होते. आरक्षण सोडत प्रक्रिया पूर्ण झाल्यामुळे आता पुढील टप्प्यात पात्र उमेदवारांच्या निवडीस सुरुवात होणार आहे.

### व्यंकटेश्वरा मेडिकल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अमरोहा (उत्तर प्रदेश) येथे श्रीपाद गणेशराव लंगोटे यांच्या निवड



तभा वृत्तसेवा
अंबड प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील सुखापुरी. हे रंगनाथराव दाजीबा लंगोटे यांचे नातू डॉ. श्रीपाद यांचा (च. इ. इ. ड) साठी व्यंकटेश्वरा मेडिकल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अमरोहा (उत्तर प्रदेश) येथे प्रवेश मिळाल्या बद्दल त्यांचा सत्कार डॉ. निसार अहमद देशमुख (जिल्हाध्यक्ष – राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार जालना जिल्हा.) तसेच के. व्ही. रुघे (मुख्याध्यापक सुखापुरी हायस्कूल सुखापुरी.) व सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सुखापुरी हायस्कूल सुखापुरी, ता. अंबड जि. जालना. यांनी अभिनंदन केले.

## पारध येथे 'जश्ने ईद–ए–मिलाद' निमित्त भव्य रक्तदान शिबिराचे यशस्वी संपन्न

तभा वृत्तसेवा
पारध / प्रतिनीधी

पारध, दि. ५ सप्टेंबर : सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण देत, जश्ने ईद – ए – मिलाद – उन – नबी (ह. मुहम्मद स. अ. व स.)च्या पवित्र निमित्ताने जालना जिल्ह्यातील पारध येथे मोहम्मदिया शादी हॉलमध्ये भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात परिसरातील शेकडो युवक – युवतींसह वयोवृद्धांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवला, ज्यामुळे रक्तदान हेच श्रेष्ठ दान हे घोषवाक्य प्रत्यक्षात उतरले. या वेळी मार्गदर्शन करताना मौलाना खलिल ने सांगितले कि प्रेषित मोहम्मद( स. अ. स). सर्व समाजाचे साठी होते जर आपल्या शेजारी (कोणतेहि धर्माचा असो ) मनुष्य उपाशी आहे आणि आपण पोट भरून जेवतो तर आपन मानव होऊ शकत नाही अशी प्रेषित मोहम्मद (स. अ. स.) ची शिकवन आहे शिबिराचे उद्घाटन पारध पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष माने यांच्या हस्ते झाले. यावेळी मुस्लिम पंच कमिटीचे अध्यक्ष अजहर पठाण, तसेच अजीज शेख, मनीष श्रीवास्तव, हाफीज खलील, सलीम खान, शेख आबेद, शेखर श्रीवास्तव, नसीर शेख, लतीफ शेख, साबेर शेख, निसार शेख, हाफीज शाहरुख, मुफ्ती इम्रान, मुफ्ती अबुसाद, संग्राम देशमुख, एन. एम. लोखंडे, बबलु तेलंग्रे, समाधान बोडखे, अमोल भुसारे, अनुज श्रीवास्तव, बाबा खान, समी खान, बाबुखान, सर्व गावकरी बांधव आणि पत्रकार मंडळी उपस्थित होते. यावेळी बोलताना सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष माने यांनी अशा समाजोपयोगी उपक्रमांमध्ये प्रत्येकाने सहभागी होण्याचे आवाहन केले. आयोजकांनी सांगितले की रक्तदानाने अनेकांचे प्राण वाचतात, त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने वर्षातून किमान एकदा रक्तदान करण्याचा संकल्प करावा. या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग विशेष उल्लेखनीय होता. रक्तदान करणाऱ्या सर्व दात्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच आयोजकांनी सर्वांसाठी अल्पोपहाराची सोय केली होती. या



उपक्रमामुळे समाजात सामाजिक ऐक्य आणि बंधुता अधिक दृढ झाल्याचे दिसून आले. या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी आयोजक मंडळाचे कार्यकर्ते, स्वयंसेवक आणि स्थानिक नागरिकांनी मोलाचे सहकार्य दिले. तरुण पिढीच्या पुढाकारामुळे पारधमध्ये रक्तदान चळवळ अधिक वेगाने पुढे जात असल्याचे या शिबिरातून स्पष्ट झाले.

## अतिवृष्टीचा तडाखा – आ . लोणीकरांच्या पुढाकाराने तात्काळ प्रशासनाचा हस्तक्षेप



तभा वृत्तसेवा
परतूर /प्रतिनिधी

परतूर शहरातील राजपूत गल्ली येथे झालेल्या अतिवृष्टीमुळे रवी सुभाषसिंग चुंगडे यांचे घर कोसळून मोठे नुकसान झाले. या घटनेची माहिती मिळताच मा. आमदार बबनराव लोणीकर व भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्याशी संपर्क साधण्यात आला. त्यांनी परिस्थितीची गंभीर दखल घेत तात्काळ प्रशासनाला आदेश देऊन संबंधित अधिकाऱ्यांना घटनास्थळी पाठविले. त्यांच्या तातडीच्या हस्तक्षेपामुळे पंचनामा व शासकीय प्रक्रिया विलंब न होता सुरु झाली. या दुर्घटनेनंतर भाजप शहराध्यक्ष प्रवीण सातोनकर, नगरसेवक प्रकाश चव्हाण यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. त्यांनी बाधित कुटुंबाला धीर देत सर्वतोपरी मदतीचे आश्वासन दिले. यावेळी तलाठी राऊत यांना पंचनामा करण्यास लावण्यात आले. शहराध्यक्ष प्रवीण सातोनकर म्हणाले की, नागरिकांवर आलेल्या संकटाच्या काळात त्यांच्या पाठीशी उभे राहणे ही आमची जबाबदारी आहे. शासनस्तरावरून मदत मिळवून देण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करणार आहोत. नगरसेवक प्रकाश चव्हाण यांनीही बाधित कुटुंबाशी संवाद साधून सांगितले की, संकट कितीही मोठे असले तरी आम्ही जनतेच्या सोबत आहोत. या घटनेत आ .लोणीकर त्वरित पुढाकारामुळे प्रशासनाने ताबडतोब प्रतिसाद दिला. त्यामुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून भाजप पदाधिकारी व लोकप्रतिनिधींच्या तत्परतेचे कौतुक केले आहे.

## बेकायदेशीर गावठी पिस्तुलासह जिवंत काडतुस बाळगणाऱ्या संतोष तायडेला ठोकल्या बेड्या !

तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

एक गावठी पिस्टल (अग्नीशस्त्र) व सहा जिवंत काडतुस बाळगणारा एका आरोपीतास घेतले ताब्यात स्थानिक गुन्हे शाखा जालना यांची कार्यवाही जालना जिल्हयात अवैध पिस्टल बाळगणारे ईसमांवर कार्यवाही करणे बाबत पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांना सुचना दिल्या होत्या. त्यानुषंगाने दिनांक ०५/०९/२०२५ रोजी अवैध अग्नीशस्त्र बाळगणारे ईसमांची माहिती घेत असतांना गुप्तबातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, ईसम नामे नाव प्रविन संतोष तायडे वय २३ वर्ष रा. गोकुळवाडी ता. जि. जालना हा बेकायदेशीर रित्या गावठी पिस्टल स्वत:च्या ताब्यात बाळगत आहे अशी खात्रीलायक बातमी मिळाल्यावरुन सदर ईसमाचा जालना शहरात शोध घेत असतांना खरपुडी चौफुली येथील इंडियन ढाबा समोर हा मिळुन आला त्यास शिताफीने ताब्यात



घेऊन त्यास गावठी पिस्टल बाबत विचारणा केली असता त्याने सदर पिस्टल पंचासमक्ष काढुन दिल्याने एक गावठी बनावटीचे पिस्टल (अग्नीशस्त्र), ०६ जिवंत काडतुस जप्त करण्यात आले त्यास विश्वासात घेऊन त्यास गावठी पिस्टल पुरवणारे ईसमां बाबत विचारणा केली असता त्याने उडवा उडवीचे उत्तरे दिल्याने त्याचे विरुध्द पोलीस ठाणे तालुका जालना येथे कलम ३/२५ कलम भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सपोनि. योगेश उबाळे, सपोनि सचिन खामगळ, पोउपनि. राजेंद्र वाघ व सोबत स्थागुशाचे अमंलदार गोपाल गोशिक, लक्ष्मीकांत आडेप, प्रभाकर वाघ, भाऊराव गायके, रमेश राठोड, सागर बाविस्कर, सतीष श्रीवास, इरशाद पटेल, रमेश काळे, कैलास चेके, अशोक जाधवर यांनी केली आहे.

## नव्या जोमाने नव्या ताकदीने पुन्हा एकजूट होण्याची गरज हीच वेळ एकत्र येण्याची - अर्जुन राठोड

### समाज जागृतीची गरज

जर मराठवाडा विभागातील बंजारा समाजाला हैदराबाद गॅझेटमुळे एसटीचा लाभ मिळत असेल, तर उर्वरित महाराष्ट्रातील बंजारा समाजालाही तोच लाभ मिळायला हवा. अन्यथा समाजात तफावत निर्माण होऊन अन्याय वाढत जाईल. समाजातील सर्व घटकांनी एकत्रितपणे या प्रश्नावर जागृती करून लढा दिला पाहिजे.

### हैदराबाद गॅझेटचे ऐतिहासिक महत्त्व

हैदराबाद संस्थानच्या गॅझेटमध्ये बंजारा समाजाचा एसटी प्रवर्गात समावेश असल्याचे ठोस पुरावे उपलब्ध आहेत. ज्या पद्धतीने या गॅझेटमधील नोंदींवरून महाराष्ट्रात मराठा समाजाचा कुनबी म्हणून उल्लेख पुरावा मानला जात आहे, त्याच तत्त्वावर बंजारा समाजालाही एसटी प्रवर्गात स्थान मिळणे ही न्याय व ऐतिहासिक गरज आहे.



### आदिवासी बंजारा समाजाचा एसटी प्रवर्गामध्ये न्याय समावेश

आदिवासी बंजारा समाज हा या देशाच्या सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि सामाजिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे. जंगल, डोंगर, तांडे, वाड्या–वस्त्यांवर निसर्गाशी नाते जोडून जगणार्या या समाजाला शतकानुशतके सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक स्तरावर अन्याय सहन करावा लागला आहे. पण आजही न्याय आणि हक्क मिळवण्यासाठी या समाजाला चळवळ उभारावी लागत आहे.

### महाराष्ट्र विभाजनापूर्वीची वस्तुस्थिती

महाराष्ट्र राज्य निर्मितीपूर्वी बंजारा समाज हा एसटी प्रवर्गात नोंदवला गेला होता. पण राज्य पुनर्रचनेनंतर या समाजाला वंचित ठेवण्यात आले. हा ऐतिहासिक अन्याय दुरुस्त करून महाराष्ट्रातील सर्व बंजारा समाजाला एसटीचा लाभ मिळाला पाहिजे.

तभा वृत्तसेवा
जालना | प्रतिनिधी

शासनाने मराठा समाजाला हैदराबाद गॅझेट च्या नोंदी नुसार जो कायदेशीर जीआर काढण्यात आला या हैदराबाद गॅझेट च्या नोंदी नुसार मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र या जीआर नुसार देण्यात येणार आहे. त्याप्रमाणे बंजारा समाजाच्या सुधा हैदराबाद गॅझेट मध्ये नोंदी आहेत आंध्रा प्रदेश मध्ये बंजारा समाज हा एसटी प्रवर्गामध्ये आहे तेलंगणा या राज्यात बंजारा समाज एसटी प्रवर्गामध्ये आहे या हैदराबाद गॅझेट च्या नोंदी नुसार बंजारा समाज हा सुद्धा एसटी प्रवर्गामध्ये समाविष्ट करता येतो म्हणून ज्याप्रमाणे मराठा समाज यांच्यासाठी जीआर काढण्यात आले त्याप्रमाणे बंजारा समाजाचे सुद्धा डढ प्रवर्गामध्ये आहे असे जीआर काढून महाराष्ट्रामध्ये सुद्धा बंजारा समाज एसटी प्रवर्गात समाविष्ट करून घेण्यात यावे असे अर्जुन नायक (राठोड) यांनी बोलतांना सांगितले. अन्यथा समाजाला आंदोलनासाठी प्रवृत्त करू नये असा इशारा त्यांनी दिला आहे. तसेच समाज बांधवांनी नव्या जोमाने नव्या ताकदीने एकजूट दाखवून देण्याची हीच ती वेळ असल्याचेही त्यांनी महटले आहे. याबाबत पुढे बोलतांना त्यांनी सांगितले की, आज तेलंगणा (एस टी), आंध्रप्रदेश (एस टी), कर्नाटक (एस. सी.) अशा लगतच्या राज्यांमध्ये बंजारा समाज आदिवासी प्रवर्गात समाविष्ट आहे. या सर्व राज्यांतील बंजारा समाजाशी रोटी – बेटी व्यवहार महाराष्ट्रातील बंजारा समाजाचा आजही अखंड सुरू आहे. सगेसोयरे, विवाह – संबंध आणि सांस्कृतिक नाते एकसंध असल्यामुळे एका राज्यात एसटी तर दुसर्या राज्यात नाही, हा भेदभाव न्याय्य ठरू शकत नाही. यासाठी बंजारा समाजाने आता आपली कंबर कसली पाहिजे. बंजारा समाजाचा एसटी प्रवर्गात समावेश व्हावा, यासाठी कायदेशीर, ऐतिहासिक आणि सामाजिक पुरावे पुरेपूर मजबूत आहेत. आता या चळवळीला समाजबांधवांनी खांद्याला खांदा लावून साथ देणे ही काळाची गरज आहे. यासाठी आपणास ठाऊक आहे की, आपण सर्व समाजबांधव समाज म्हणून एकत्र येण्याची गरज सध्या आहे. वेगवेगळ्या संघटना, वेगवेगळे विचार परंतु आपल्या न्याय हक्कासाठी पुन्हा एकदा नव्या जोमाने नव्या ताकदीने एकजूट होण्याची गरज आहे. आपण एकत्र आलो तर निश्चितपणे आपल्याला न्याय मिळाल्याशिवाय राहणार नाही त्यासाठी सर्व समाज बांधवांनी एकत्र यावे असे आवाहन अर्जुन नायक (राठोड) यांनी केले. आज इतिहास आपल्याला एक सुवर्णसंधी देत आहे. बंजारा समाजाचे हक्काचे स्थान पुन्हा मिळवण्यासाठी, पुढील पिढ्यांना न्याय देण्यासाठी आणि समाजाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी प्रत्येक समाजबांधवाने या आंदोलनात सहभागी व्हावे. आपल्या न्याय्य हक्कासाठी, भावी पिढ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी आणि समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी पुन्हा एकदा पांढरे वादळ हे महाराष्ट्रात घोंगावणार असुन बंजारा समाजाने आंदोलन उभे करण्यात येणार आहे. वेगवेगळ्या संघटना, वेगवेगळे विचार असले तरी एकत्र येण्याची वेळ आली आहे. आपल्या एकतेच्या बळावर आपण हा न्याय मिळवू आणि बंजारा समाजाला पुन्हा त्याचे खरे स्थान मिळवून देऊ शकतो असेही अर्जुन नायक यांनी महटले आहे.

# नांदेड तालुक्यात १५ सप्टेंबरपर्यंत ई-पीक पाहणी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ५ सप्टेबर-**

ई-पीक पहाणी करण्यासाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व उप विभागीय अधिकारी नांदेड डॉ. सचिन खल्लाळ यांच्या मार्गदर्शना नुसार नांदेड तालुक्यात ग्रामीण भागात ई-पीक पहाणी करण्यासाठी जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय व संशोधन केंद्र सिडको नांदेड येथील एमएसडब्लू व बीएसडब्लूच्या विद्यार्थ्यांचे सहकार्य घेण्यात येणार आहे. याबाबत या विद्यार्थ्यी यांना नियोजन भवन नांदेड येथे नविन ई-पीक पहाणी (डीसीएस) अँपचे पीपीटीव्दारे प्रशिक्षण ४ सप्टेंबर रोजी देण्यात आले.

तहसिलदार नांदेड संजय वारकड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून १५ सप्टेंबर २०२५ पर्यंत शेतकरी लॉगीन मधून ई पीक पाहणी पुर्ण करून घेण्याबाबत सुचना केल्या.

ई पीक पाहणीच्या अनुषंगाने तहसील कार्यालयाच्यावतीने सर्व बीएसडब्लू व एमएसडब्लूच्या विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण देण्यात आले . एका गावामध्ये एक किंवा दोन-तीन असे विद्यार्थ्यांची नेमणूक केली असून, संबंधित ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांनी त्या विद्यार्थ्यांना समजावून सांगून त्यांचे सहकार्य घेऊन ई पीक पाहणी डीसीएसव्दारे आपल्या गावातील १०० टक्के करावयाचे आहे . अशा सुचना ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांनी एक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून मुदतीत यशस्वी करावे असे आवाहन तहसिलदार नांदेड यांनी केले.

विद्यार्थ्यांना या अँप व्दारे काम करतांना गाव पातळीवर ग्राम महसूल अधिकारी (तलाठी),ग्राम पंचायत अधिकारी (ग्रामसेवक) व सहाय्यक कृषी अधिकारी (कृषीसहाय्यक) ,सरपंच, ग्रामपंचायत सदस्य,पोलिस पाटील , महसूल सेवक (कोतवाल),ग्राम रोजगार सेवक,आपले सरकार सेतू संचालक व ग्राम पंचायत ऑपरेटर,सीएससी सेंटर चालक यांनी एमएसडब्लू महाविद्यालयातील नियुक्त सहाय्यक विद्यार्थ्यांना मदत करावी व मार्गदर्शन करावे अशा सुचना दिल्या. जे विद्यार्थी उत्कृष्ट कार्य करतील त्यांची प्रशासना कडून नोंद घेण्यात येईल असे सांगितले. जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य मुजावर व प्राध्यापक विदयाधर रेड्डी व एस एस शिंदे यांनी महाविद्यालया तर्फे विद्यार्थ्यांकडून मुदतीत अँप व्दारे काम करून सहकार्य करू असे सांगितले. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी ई पीक पहाणी डीसीएस अँप डाऊनलोड केले.या प्रशिक्षणास तहसिलदार नांदेड संजय वारकड, परिविक्षाधिन तहसिलदार अभयराज ननजुंडे,नायब तहसिलदार महसूल सुनिल माचेवाड,मंडळ अधिकारी तरोडा शिवानंद स्वामी,अका सुरेखा सुरुंगवाड ,ग्राम महसूल अधिकारी एम के पाटिल,मनोजकुमार जाधव,दिलीप पवार व माधव शिराळे अदि उपस्थित होते.

नांदेड तालुक्यातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सोसायटीचे अध्यक्ष पदाधिकारी व प्रतिष्ठित व्यक्ती यांनी एमएसडब्लूचे विद्यार्थी आल्यानंतर त्यांचे टेक्निकल मार्गदर्शन घेऊन आपल्या गावतील ई-पीक पाहणी शंभर टक्के करावी असे आवाहन तहसिलदार नांदेड यांनी केले आहे.

## प्रलंबित वक्फ प्रकरणे तात्काळ निकाली काढा,अन्यथा चेअरमनांच्या घरांवर तीव्र आंदोलन ; शब्बीर अन्सारी यांचा इशारा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ५ सप्टेबर-**

तहरीक-ए-औकाफच्या वतीने वक्फ बोर्डाकडे ५४ प्रलंबित प्रकरणांचे निवेदन देण्यात आले होते. त्यातील सात प्रकरणे प्राधान्याने निकाली काढण्याचे आश्वासन मिळूनही तब्बल सहा महिने उलटले आहेत. दुर्दैवाने एका प्रकरणाचा अपवाद वगळता उर्वरित सर्व प्रकरणांवर अद्याप धुळफेक होत आहेत.

या पार्श्वभूमीवर येत्या ९ सप्टेंबर रोजी मुंबईत होणाऱ्या बैठकीत प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निकाल न लागल्यास वक्फ बोर्डाच्या सदस्यांच्या व चेअरमनांच्या घरांवर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा तहरीक-ए-औकाफचे संस्थापक अध्यक्ष तथा ज्येष्ठ ओबीसी नेते शब्बीर अन्सारी साहेब यांनी आज नांदेड येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिला.

नांदेड जिल्ह्यातील हजरत दुलेशाह दरगाह आणि बिलोलीतील ऐतिहासिक काला पत्थर मशीद परिसरातील भूखंडांची प्रकरणे विशेष महत्त्वाची असून त्यांचा तातडीने निपटारा करणे अत्यावश्यक आहे, असे अन्सारी साहेब म्हणाले.



शब्बीर अन्सारी सध्या कर्करोगासारख्या गंभीर आजारावर उपचार घेत असूनदेखील हजरत दुलेशाह रहमान यांच्या १४७व्या उर्सनिमित्त नांदेडला हजेरी लावून स्थानिक प्रतिष्ठित नागरिकांशी संवाद साधला व पत्रकार परिषद घेऊन नांदेड येथील प्रलंबित प्रकरणासाठी वक्फ बोर्डाला जबाबदार ठरवले.

नांदेडच्या शासकीय विश्रामगृहात झालेल्या पत्रकार परिषदेत तहरीक-ए-औकाफ नांदेड जिल्हाध्यक्ष फारुक अहमद, मार्गदर्शक एम. ए. हफीज, शफी मुसा, ड. शेख बिलाल, महंमद कासिम, ड. महंमद शाहेद, बिलोली येथील इम्रान खान, हैदर अली, आजम खान आदी उपस्थित होते. तसेच ओबीसी संघटनेचे रिजवान कुरैशी, अब्दुल मोहीत यांसह इतर पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माहुरात सकल मराठा समाजाकडून विजयोउत्सव

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. ५ सप्टेबर-**

मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते जी आर स्वीकारत मनोज जरांगे पाटील यांनी अखेर ०२ सप्टेंबर रोजी आमरण उपोषण सोडले.याचा माहूर तालुक्यातील सकल मराठा समाजातर्फे शहरातील छ.शिवाजी महाराज चौक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक,श्री दत्त चौक टी पॉईंट जल्लोष करत संघर्ष योद्धा जरांगे पाटील व आंदोलनात तन-मन-धनाने सहभागी होणाऱ्या, प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या समाज बांधवांचे हार्दिक अभिनंदन करत आभार मानले. यावेळी फटाक्यांची जोरदार आतषबाजी करून 'विजय उत्सव' उत्साहात साजरा करण्यात आला.

## कृषी शिक्षणाची नवदिशा : नायगांवच्या कृषी दुतांची सगरोळीची भेट ठरली प्रेरणादायी!

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. ५ सप्टेबर-**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी अंतर्गत कृषी महाविद्यालय नायगाव (बा.) येथील सातव्या सत्रातील रावे विद्यार्थ्यांनी कृषी विज्ञान केंद्र सगरोळी येथे शैक्षणिक भेट दिली. ग्रामीण जागरूकता कार्यानुभव व कृषी औद्योगिक संलग्नतेच्या उपक्रमांतर्गत आयोजित या भेटीत विद्यार्थ्यांनी आधुनिक शेती तील तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता ख आणि विविध कृषी आधारित उद्योगांचे प्रात्यक्षिक स्वरूपात ज्ञान घेतले.

मुख्य शास्त्रज्ञ डॉ. संतोष चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना नोकरी मागणारे नाही, तर नोकरी देणारे बना असा प्रेरणादायी संदेश दिला. त्यांनी पारंपरिक शेती समोरील आव्हानांवर मात करण्या साठी नवतंत्रज्ञानाचा वापर, कृषी उद्योगातील संधी आणि शाश्वत शेतीचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी विविध विषय तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले आणि शेतकऱ्यांसाठी केंद्रात राबवले जाणारे उपक्रम विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष दाखवले.

ही भेट प्राचार्य डॉ. आर. जी. नादरे, उपप्राचार्य नागेश घुबेराव, समन्वयक प्रा. शंकर नागणीकर आणि कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. एस. ए. शेंडगे यांच्यासह प्रा. डॉ. डी. डी. देशमुख,डॉ.नीता देवकत्ते, प्रा. डॉ. माधवी जंगीलवाड मॅडम यांच्या मार्गदर्शना खाली पार पडली. कृषीदूत व कृषी कन्यांनी यामध्ये उत्स्फूर्त सहभाग घेत, परिश्रमपूर्वक आयोजन केले.

## संक्षिप्त वृत्त

### माळावरचा राजा गणेश मंडळाच्या वतीने सलग अकरा दिवस अन्नदान

**हाणेगाव**-हाणेगाव येथील माळावरचा राजा गणेश मंडळाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही सलग अकरा दिवस वेगवेगळ्या प्रकारचे प्रसाद बनवून अन्नदानाचा उपक्रम राबविण्यात आला. गावात जाणाऱ्या मुख्य चौरस्त्यावर गणेश बसवल्यामुळे लोकांची रहदारी जास्त असल्याने गावातील व परीसरातील असंख्य लोकांनी अन्नदानाचा लाभ घेताना दिसतात तर या उपक्रमातून समता बंधुता एकात्मतेचा संदेश दिसून येत आहे या ठिकाणी मोठी बाजारपेठ असल्यामुळे इतर गावाहून लोक ये-जा करत असतात खरेदी विक्री करण्यासाठी लोकांची या ठिकाणी मोठी वर्दळ असते गावात जाणाऱ्या मुख्य चौरस्त्यावर गणेश बसवल्यामुळे लोकांना यामुळे जेवणाची सोय होत असुन भुकेल्यांना अन्न तहानलेल्यांना पाणी द्यावं या म्हणी प्रमाणे 'सर्वात श्रेष्ठ दान अन्नदान' म्हणुन माळावरचा राजा गणेश मंडळाचे पदाधिकारी याच्यात भाग घेऊन सलग अकरा दिवस वेगवेगळ्या प्रकारचे अन्न बनवून महाप्रसादाच्या स्वरूपात लोकांना अन्नदान करत असतात त्यांच्या या कार्याला गावातील व परिसरातील असंख्य लोकांनी कौतुक केले आहेत. हा अन्नदानाचा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी दानशूर व्यक्तिमत्व मारोती बिरादार,संजय मचकुरी,गजाणन मचकुरी,दिपक मचकुरी,अनील मंडलापुरे,वैभव मंडलापुरे,आकाश गीरेवाड,शिवाजी गिरेवाड,गणेश मचकुरी,अजय मचकुरी,विजय मचकुरी ,गणेश नाईकवाडे,हणमंत मचकुरी,रुषीकांत पुलेवाड,शेखर पाटील,शाम गीरेवाड आदी जणांनी परिश्रम घेतले आहे.

### आक्षेपार्ह विधान करणाऱ्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी

**हदगाव**-हदगाव तालुक्यातील निवघा (बा) येथे एक अत्यंत धक्कादायक व संवैधानिक पदांवर असलेल्या देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व आमदार महोदय यांच्या विरोधात आक्षेपार्ह व अपमानास्पद शब्दांचा वापर करून समाज माध्यमांवरती तो व्हिडिओ प्रसारित करण्याची घटना घडली होती. सदर घटनेस जबाबदार असणाऱ्या महेश कदम व त्यास प्रोत्साहन देणाऱ्या निवघा (बा) येथील पोलीस पाटील बालाजी कानडे यांच्या विरोधात तात्काळ कारवाई करून त्यांना बडतर्फ करून आवश्यक ती कठोर कारवाई करण्याची मागणी भाजपाचे तालुकाध्यक्ष बाला पाटील यांनी निवेदनाद्वारे प्रशासनाकडे केली आहे. देशाच्या पंतप्रधान व आमदार यांच्या विरोधात आक्षेपार्ह व अपमानास्पद शब्दांचा वापर करून महेश कदम या व्यक्तींनी समाज माध्यमांवर व्हिडिओ प्रसारित केला होता या गंभीर व समाजास दिशाभूल करणाऱ्या प्रकारास निवघा बाजार येथील पोलीस पाटील बालाजी कानडे यांनी विरोध दर्शविता उलट प्रोत्साहन दिल्याचे निदर्शनास आल्याचे नमूद केले आहे तरी संवैधानिक पदास अपशब्द वापरणाऱ्यास कठोर कारवाई करण्याची मागणी भाजपाचे तालुकाध्यक्ष बाला पाटील यांनी निवेदनाद्वारे प्रशासनाकडे केली आहे.

### मुदखेड ठाण्याचे पोलीस जमादार सुरेश दवणे यांचा निरोप समारंभ

**मुदखेड**- मुदखेड येथील पोलीस ठाण्याचे कर्तव्यदक्ष पोलीस जमादार सुरेश नारायण दवणे यांची मुदखेड येथून बदली नांदेड मुख्यालय येथे झाली आहे.मुदखेड पोलीस ठाण्याच्या वतीने त्यांचा निरोप समारंभ कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता सुरेश दवणे यांचा शाल व पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला यावेळी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण पोलीस उपनिरीक्षक शिवाजी शिंदे, रघुवंशी. किशोर पाटील, गणपत बोरगावकर, अरविंद सिंगारपुतळे, संगीता शेळके मॅडम, जमादार जाबेर भाई, यांच्यासह पोलिस ठाणे येथील अधिकारी सर्व पोलीस कर्मचारी,व होमगार्ड यांची उपस्थिती होती.

### मनीषा आश्रम शाळा येथे द्वितीय केंद्रीय शिक्षण परिषद

**हिमायतनगर**- तालुक्यातील मौजे पोटा बुद्रुक संकुलाअंतर्गत घेण्यात आलेल्या द्वितीय केंद्रस्तरीय शिक्षण परिषद मनीषा आश्रम शाळा पोटा बु येथे श्रीमती सुनिता संगेवार पदोन्नत केंद्रीय मुख्याध्यापिका पोटा बुद्रुक यांच्या अध्यक्षतेखाली ४ सप्टेंबर रोजी पार पडली. मा.श्री पद्माकर कुलकर्णी केंद्रप्रमुख तथा शिक्षण विस्तार उपस्थिती होती. तसेच मनिषा आश्रम शाळा येथिल मुख्याध्यापकलक्ष्मण सुर्यवंशी सर , दिपक कुलकर्णी सर मुख्याद्यापक पारवा खु, नारायन गायकवाड यासह अनेक मान्यवर उपस्थित होती. मान्यवरांच्याहस्ते क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून पूजन करून उपस्थितीतांचे स्वागत मनिषा आश्रम शाळेच्या वतीने करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक पद्माकर कुलकर्णी केंद्रप्रमुख यांनी केले पहिल्या सत्रात शिक्षण परिषदेचे विषय घेण्यात आले असून केंद्रप्रमुख यांनी एकंदरीत सर्व विषयाबद्दल सविस्तर शिक्षण परिषदेसाठी आलेल्या सर्व शिक्षकांना मार्गदर्शन केले. व प्रशासकीय बाबींचा आढावा त्यांनी घेतला. शिक्षण परिषदेमध्ये घेण्यात आलेले विषय स्वच्छ आणि हरित विद्यालय रजिस्ट्रेशन आणि फोटो अपलोडिंग श्री संदीप कुरपतवाड सर तसेच आधार अपार अपडेट निपुण भारत माता पालक गट पूर्नबांधन सचिन भालेराव सर या साधन व्यक्तीने उपरोक्त विषयाचे विवेचन केले गायकवाड सरांनी उपस्थित सर्वांचे मनोरंजनात्मक मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री पंडित तळेगावकर सर यांनी केले तर शेवटी आभार प्रदर्शन शंकर गच्चे यांनी केले या खेळीमेळीच्या वातावरणात ही द्वितीय शिक्षण परिषद मनीषा आश्रम शाळा येथे संपन्न झाली असुन याबद्दल उपस्थित मान्यवर शिक्षकवंद यांनी समाधान व्यक्त केले.

## भर पावसात माहूर पोलिसांचे पथसंचालन



**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. ५ सप्टेबर-**

श्री गणेशोत्सव तसेच ईद मिलादुन्नबी या देश पातळीवर साजरा होणाऱ्या सण उत्सवांच्या पार्श्वभूमीवर माहूर पोलिसांनी शहरातील मिरवणूक मार्गावरून भर पावसात पथ संचलन केल्याने नागरिकांतून पोलिसांचे अभिनंदन होत असून,गणेशोत्सव शांततेत, डीजे मुक्त, सदभावना, धार्मिक सलोखा राखत साजरा करावा, असे आवाहन पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी यावेळी केले आहे.

माहूर शहरात १९ ठिकाणी श्री गणेशाची स्थापना करण्यात आली असून तालुक्यात दीडशेवर श्री गणेश मंडळांनी मोठ्या भक्ती भावात श्री गणेशाची स्थापना करून या ठिकाणी विविध कार्यक्रमासह धार्मिक कार्यक्रम तसेच अनेक ठिकाणी रक्तदान शिबिरही घेण्यात आलेली आहेत श्री गणेशाची स्थापना केल्यानंतर दररोजच पाऊस पडत असून अनेक ठिकाणी धार्मिक सामाजिक कार्यक्रमात पावसाचे विघ्न येत असले तरीही गणेशभक्त मोठ्या भक्ती भावाने श्री गणेशाची पूजाअर्चा सह धार्मिक कार्यक्रम घेतच आहेत भर पावसात श्री गणेशाची स्थापना असलेल्या ठिकाणी कुठलेही व्यत्यय येऊ नये म्हणून पोलीस निरीक्षक गणेश कराड हे स्वतः या ठिकाणी भेटी देत आहेत.

तालुक्यात शांतता राहावी यासाठी पोलीस निरीक्षक गणेश कराड हे रात्रंदिवस पोलीस स्टेशन हद्दीतील सर्वच गणेश मंडळांना भेटी देत आहेत.या पार्श्वभूमीवर माहूर शहरातून आज दि श.४ रोजी दुपारी ४ वाजता पथ संचलन करण्यात आले.यावेळी पाऊस भरपूर पडत असतानाही पोलिसांनी पथसंचलन चालू ठेवले हे विशेष उल्लेखनीय आहे.संचलन भर पावसात सुरू असल्याने नागरिकांनी पोलिसांच्या कर्तव्याप्रती आदर व्यक्त करून त्यांचे अभिनंदन केले. यावेळी पोलीस निरीक्षक गणेश कराड, सपोनी शरद घोडके, पोउपनी पालसिंग ब्राह्मण, पोउपनी संदीप अन्येबोईनवाड, सपोउपनी बाबू जाधव यांचे सह पोलीस, होमगार्ड मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खरब खंडगांवात जश्ने मिलादुन्नबी उत्साहात

**तभा वृतसेवा**
**आदमपुर, दि. ५ सप्टेबर-**

ग्राम खरब खंडगांव येथे जश्ने रजा कमिटीच्या वतीने इस्लाम धर्माचे संस्थापक हज़रत मोहम्मद पैगंबर सल्लालाहु व अलैहिव सल्लम यांच्या १५०० व्या जन्मोत्सवानिमित्त शुक्रवार दि.५ सप्टेंबर रोजी मुख्य गाव परिसरातून 'जश्ने जुलूस' नाते पाकच्या गजरात मिरवणूक वाजत गाजत काढण्यात आली.

या कार्यक्रमात गावचे युवा सरपंच तथा पोलीस पाटील डॉ. रणजित काळे, अविनाश काळे, योगेश काळे, हज़रत सलमान, गुलाम मोहम्मद आदी उपस्थित होते.

## घरगुती गणपती नगरपालिकेच्या कृत्रिम तलावात विसर्जन करावेत: गौरव वांडेकर

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. ५ सप्टेबर-**

हदगाव नगर परिषदेच्या वतीने माझी वसुंधरा ६.० व स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत सर्व नागरिकांना जाहीर आवाहन करण्यात येते की ,घरगुती गणपती विसर्जन नगरपालिकेच्या कृत्रिम तलावात विसर्जन करावे तसेच यावेळी लकी ड्रॉ काढून एकूण दहा गणेश भक्तांना आकर्षक बक्षीस देण्यात येतील तरी या पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्याकरिता या उपक्रमात आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन मुख्याधिकारी गौरव वांडेकर यांच्या वतीने करण्यात आले. अधिक माहितीसाठी ७०३८९०८३५१, ७५०७११८५४५ या क्रमांकावर संपर्क करण्याचे देखील कळविण्यात आले.

आगामी होणाऱ्या श्रींच्या विसर्जनापूर्वी हदगाव नगरपरिषदेच्या वतीने पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्याच्या उद्देशाने दि. ६ सप्टेंबर या दिवशी होणाऱ्या विसर्जनाच्या निमित्ताने घरगुती गणपती विसर्जन करणाऱ्या सर्व नागरिकांनी आपल्या गणपतीची मूर्ती नगरपरिषद कार्यालय हदगाव या ठिकाणी तयार करण्यात आलेल्या कृत्रिम तलावात विसर्जन करण्याचे आवाहन व यावेळी दहा गणेश भक्तांना आकर्षक बक्षीस देखील देण्यात येतील तरी या उपक्रमात शहरातील सर्व नागरिकांनी आपला सहभाग नोंदवावा असे गौरव वांडेकर यांच्या वतीने आवाहन करण्यात आले.

## विद्यार्थ्यांमध्ये समाजसेवेचे संस्कार झाले पाहिजे : उपविभागीय अधिकारी सचिन खल्लाळ

**तभा वृतसेवा**
**अर्धापूर, दि. ५ सप्टेबर-**

आपण समाजाकडून नेहमी खूप काही घेत असतो. घेता घेता समाजाला देण्याची प्रवृत्ती विद्यार्थ्यांमध्ये विकसित झाली पाहिजे राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांवर समाजसेवेचे संस्कार झाले पाहिजे. शासनाच्या विविध योजना व त्याची तांत्रिक माहिती विद्यार्थ्यांनी अवगत करून ती समाजापर्यंत पोहोचावी. आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत सुरू असलेल्या आरोग्य योजनेची तांत्रिक बाबी अवगत करावीत असे प्रतिपादन नांदेड महसूल विभागाचे उपविभागीय अधिकारी सचिन खल्लाळ यांनी व्यक्त केले ते अर्धापूर येथील शंकरराव चव्हाण महाविद्यालयात, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, तहसील कार्यालय अर्धापूर व अर्धापूर तालुका आरोग्य कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयुष्यमान भारत योजने अंतर्गत *गोल्डन कार्ड* काढणे प्रशिक्षण कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.करुणा देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.साईनाथ शेटोड यांची उपस्थिती होती. मंचावर तहसीलदार रेणुकादास देवणीकर, अर्धापूर तालुका आरोग्य अधिकारी, डॉक्टर श्रीकांत देसाई, नायब तहसीलदार दिनेश खंदारे, कार्यक्रमाधिकारी डॉ. काजी मुक्तारोदिन, डॉ. निलकंठ लांडे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी तहसीलदार रेणुकादास देवणीकर म्हणाले की प्रधानमंत्री जनधन आरोग्य योजना व महात्मा फुले आरोग्य योजना अशा आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना ५ लाख रुपये पर्यंतचा विमा मिळणार आहे. त्यासाठी गोल्डन कार्ड काढणे आवश्यक आहे. गोल्डन कार्ड काढण्यासाठी तांत्रिक बाबी अवगत कराव्या लागतात पिवळी, केसरी शिधापत्रिका व अंत्योदय शिधापत्रिका तसेच डिजिटल शिधापत्रिका धारकांना योजनेचा लाभ घेता येते. शासनाने ९३२ आजारांना या योजनेत समाविष्ट केलेला आहे तसेच या योजनेचा लाभ शासकीय रुग्णालयासह शासनाने निर्धारित केलेल्या खाजगी रुग्णालयामधूनही मिळू शकते. असे ते म्हणाले तसेच आरोग्य तालुका आरोग्य अधिकारी यांनी या योजनेची सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप करताना डॉ.साईनाथ शेटोड म्हणाले की राष्ट्र उभारणीमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांचा खूप महत्त्वाचा वाटा आहे. चांगल्या गोष्टी समाजामध्ये रुजवण्याचे काम हे विद्यार्थी करतील असे ते म्हणाले. याप्रसंगी तज्ञ प्रशिक्षक श्री.कृष्णा चौधरी व श्री.कृष्ण माडेवाड यांनी विद्यार्थ्यांना तांत्रिक प्रशिक्षण दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ.काजी मुक्तारोद्दिन यांनी केले. त्यांनी कार्यक्रमाविषयी सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.नीलकंठ लांडे यांनी केले तर आभार डॉ. निरंजन गिरी यांनी मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील डॉ.विक्रम कुंटूरवार, डॉ. रघुनाथ शेटे, डॉ.संगिता घुगे, डॉ.परमेश्वर पौळ, डॉ.मंगेश पोतंगले, डॉ.विनोद शिंदे डॉ.जागीरदार आजरा, प्रा.शंकर देशमुख,प्रा. आदित्य भांगे, प्रा.कांबळे, डॉ.झिनत परवीन यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## आ. राजेश पवार यांची स्वारातीम विद्यापीठच्या अधिसभेवर नियुक्ती !

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. ५ सप्टेबर-**

नायगाव विधानसभेचे अतिशय उच्चशिक्षित आमदार राजेश पवार यांची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील आधिसभाच्या महाराष्ट्र विधानसभेच्या प्रतिनिधी पदी नियुक्ती करण्यात आली. ही नियुक्ती विद्यापीठाच्या प्रशासकीय आणि शैक्षणिक धोरणांवर देखरेख ठेवणारी एक महत्त्वाची संस्था आहे.

विद्यापीठाच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या नवीन अभ्यासक्रम, संशोधन प्रकल्प किंवा सामाजिक उपक्रमांबाबत विद्यार्थी व पालकांच्या मागणीनुसार सूचना देणे,विद्यापीठाच्या वार्षिक अंदाजपत्रकाला मंजुरी देणे, आणि आर्थिक बाबींवर देखरेख ठेवणे असे असून याशिवाय राज्य सरकारकडून मिळणाऱ्या निधीचा योग्य विनियोग होतो की नाही यावर लक्ष ठेवणे व भ्रष्टाचारास आळा घालणे,स्थानिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी आमदार आपल्या मतदारसंघातील शैक्षणिक आणि सामाजिक समस्यांना आधिसभेच्या व्यासपीठावर मांडतात. उदाहरणार्थ, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी विशेष अभ्यासक्रम, शिष्यवृत्ती किंवा सुविधा याबाबत सूचना देऊ शकतात.विद्यापीठ आणि सरकार यांच्यात दुवा हे ठरवून आमदार विद्यापीठ आणि राज्य सरकार यांच्यातील समन्वय साधतात. विद्यापीठाला आवश्यक निधी, पायाभूत सुविधा किंवा कायदेशीर समर्थन मिळवून देण्यासाठी प्रयत्न करतात.



आमदार यांच्या नियामक भूमिकाही पुढील प्रमाणे असतात.आधिसभा विद्यापीठाच्या कुलगुरू, कुलसचिव आणि इतर प्रमुख अधिकाऱ्यांच्या कामकाजावर देखरेख ठेवते. आमदार या प्रक्रियेत योगदान देऊन विद्यापीठाची जबाबदारी आणि पारदर्शकता सुनिश्चित करतात. त्याचप्रमाणे सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रम राबवण्याबाबत मार्गदर्शन करतात.विद्यापीठाद्वारे राबविल्या जाणाऱ्या सामाजिक उपक्रमांमध्ये उदा. निर्मलग्राम, जलयुक्त शिवार आदी उपक्रमामध्ये आमदारांचा सहभाग असतो. ते या उपक्रमांना स्थानिक पातळीवर पाठबळ देऊ शकतात.

उपरोक्त पार्श्वभूमीवर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील कार्य कक्षेत असणाऱ्या सामान्यतः नांदेड, लातूर, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यांतील आमदारांपैकी काहींची नियुक्ती केली जाते. यामध्ये नायगाव विधानसभेचे अतिशय उच्चशिक्षित व कर्तव्यदक्ष आमदार राजेश पवार यांची शासनाने म्हणजेच राज्यपालांनी त्यांच्या अनन्य साधारण कृतीशील व समाज उपयोगी बुद्धिमत्तेची दाद घेऊन नियुक्ती केली. हे वृत्त नायगाव विधानसभेसह उमरी - धर्माबाद मध्ये धडकताच त्यांच्या चाहत्यांमध्ये एकच जल्लोष पाहायला मिळाला.

**विद्यापीठाच्या सर्वांगीण विकासात योगदान देण्याचा संकल्प : आ. पवार**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आधीसभेवर महाराष्ट्र राज्य विधानसभेच्या प्रतिनिधी सदस्य पदी नियुक्ती करून माझ्यावर राज्य शासनाने जो विश्वास दाखवला त्यास मी पात्र ठरुन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा सर्वांगीण विकास व विद्यार्थ्यांना रोजगाराच्या कायमस्वरूपी संधी याविषयी अभ्यासपूर्ण अमुलाग्र योगदान देण्याचा मी संकल्प केला असून शासनाचे मी आभार मानतो जेणेकरून त्यांनी माझ्यावर एवढा प्रचंड विश्वास दाखवला अशा प्रतिक्रिया त्यांनी दैनिक तरूण भारत जवळ दिल्या आहे .